दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–३५ | गुरूवार दि.२३ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### महिला आरक्षण:घोषणांमधील जोश आणि कृतीतील संकोच

महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा देशातील राजकारण तापले आहे. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील आरोप-प्रत्यारोप, विधेयकावरून रंगलेले शाब्दिक युद्ध आणि 'महिलांचे खरे तारणहार आम्हीच' ही दाखवण्याची चढाओढ या सगळ्यामुळे विषयाची गांभीर्य काही काळ बाजूला पडल्याचे चित्र दिसते. प्रत्यक्षात मात्र निवडणुकांमधील उमेदवारी वाटप पाहिले, तर सर्वच पक्षांची भूमिका ही आश्वासनांपेक्षा कृतीत खूपच कमी पडणारी आहे, हे स्पष्ट होते.

# शेतकरी कर्जमाफीला मिळणार गती

## उच्चाधिकार समितीचा अहवाल सरकारकडे सादर

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंदर्भात महत्त्वपूर्ण घडामोड समोर आली असून, कर्जमाफीच्या प्रक्रियेला आता गती मिळण्याची शक्यता आहे. शेतकरी कर्जमाफीसाठी गठित करण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीने आपला सविस्तर अहवाल राज्य सरकारकडे सादर केला आहे. या समितीचे अध्यक्ष प्रमुख आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी असून, त्यांनी हा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला आहे.**



सरकारकडून या अहवालाची सखोल छाननी केली जाणार असून, त्यानंतर तो मंत्रिमंडळासमोर मंजुरीसाठी ठेवण्यात येणार आहे. या अहवालात शेतकऱ्यांची थकीत कर्जातून मुक्तता करण्यासाठी तसेच त्यांच्या आर्थिक स्थितीत शाश्वत सुधारणा घडवून आणण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांचा समावेश असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. दरम्यान, राज्य सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना'बाबतही स्पष्टता येऊ लागली आहे. या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार आहे. तसेच जे शेतकरी नियमितपणे कर्जफेड करतात, त्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यामुळे प्रामाणिक कर्जदारांनाही दिलासा ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### तब्बल १५० वर्षांनंतर जगावर 'एल निनो'चे संकट

न्यूयॉर्क/नवी दिल्ली : यंदा संपूर्ण जग एका मोठ्या भीषण संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे. एक अत्यंत वाईट बातमी समोर आली आहे. १८७७-७८ मध्ये अशीच घटना घडली होती, ज्या घटनेने संपूर्ण जगात हाहाकार उडाला होता, त्याची पुनरावृत्ती २०२७ मध्ये घडू शकते असा अंदाज तज्ज्ञांकडून वर्तवण्यात आला आहे. मोठ्या नैसर्गिक आपत्तीचे संकेत मिळत आहेत. जगभरातील हवामान तज्ज्ञांकडून यंदाच्या मान्सूनबाबत धडकी भरवणारा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यंदाच्या मान्सूनवर अल निनोचे सावट आहे. यंदाचा अल निनो एवढा शक्तिशाली आहे की, यापूर्वी अशी घटना १८७७ मध्ये घडली होती. १८७७ मध्ये संपूर्ण जगात भीषण दुष्काळ पडला होता, त्या वर्षभरात दुष्काळामुळे अनेक लोकांचे मृत्यू झाले. त्यानंतर पुन्हा अशा कोणत्याही दुष्काळाची नोंद झाली नाही. मात्र यावर्षी तशाच स्वरुपाच्या अल निनोचा प्रभाव पावसावर पडण्याचा अंदाज जगभरातील हवामान तज्ज्ञांकडून वर्तवण्यात आला आहे.

### वर्ग–२ जमिनीचे वर्ग– १ मध्ये रुपांतरण होणार

मुंबई: राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत भोगवटादार वर्ग– २ जमिनींबाबत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील कमाल जमीन धारणा मर्यादा नियमानुसार भोगवटादार वर्ग– २ मधून भोगवटादार वर्ग– १ मध्ये रुपांतरणाच्या अधिमुल्याची पुनर्रचना करण्यासाठी अधिसूचना काढण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. भोगवटादार वर्ग– २ मधील जमिनींचे हस्तांतर संबंधित सरकारी अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय करता येत नाही. अशी प्रक्रिया करण्यास सरकारचे निर्बंध आहेत. विविध कायद्यांतर्गत वाटप अथवा प्रदान केलेल्या या जमिनी असतात. तर भोगवटादार वर्ग– १ मधील जमिनीचा मालक हा स्वतः शेतकरी असतो. अशा जमिनींचे हस्तांतरण करण्यासाठी कोणतेही निर्बंध नाही.

### सात दहशतवाद्यांना शिक्षा

बंगळूरू : २०२३ च्या बंगळूरू तुरुंग कट्टरतावाद प्रकरणात एका महत्त्वपूर्ण निकालात, एनआयए विशेष न्यायालयाने सूत्रधार टी. नसीरसह सात आरोपींना दोषी ठरवले आहे. सर्व दोषींना सात वर्षांच्या सक्त कारावासाची आणि ४८,००० रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या प्रकरणात टी. नसीर व्यतिरिक्त सय्यद सुहेल खान, मोहम्मद उमर, झाहिद तबरेज, सय्यद मुदस्सिर पाशा, मोहम्मद फैसल रब्बानी आणि सलमान खान यांना शिक्षा सुनावण्यात आली आहे. हे प्रकरण लष्कर-ए-तोयबाशी संबंधित एका दहशतवादी कटाशी निगडित आहे, हे बंगळूरच्या परप्पना अग्रहारा मध्यवर्ती कारागृहात रचण्यात आला होता. या कटात, भारतातील दहशतवादी कारवायांमध्ये वापरण्यासाठी कारागृहात कैद असलेल्या तरुणांना ओळखणे, त्यांची भरती करणे, त्यांना प्रशिक्षण देणे आणि कट्टरपंथी बनवणे यांचा समावेश होता. आरोपी बंगळूरुमध्ये दहशतवादी हल्ला करण्याची आणि बंदी घातलेल्या संघटनेचा भारतविरोधी अजेंडा पुढे नेण्याच्या नियोजनात होते.

# देवस्थान इनाम जमिनींच्या हस्तांतरणाबाबत सरकार ॲक्शन मोडवर

## तीन दिवसांत कायद्याचा मसुदा जाहीर करणार

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील देवस्थान इनाम जमिनींचा प्रश्न सोडवण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यासाठी जुलैच्या अधिवेशनात कायदा आणणार आहोत. या कायद्याचा मसुदा हरकती आणि सूचना नोंदविण्यासाठी पुढील तीन दिवसांत संकेतस्थळावर उपलब्ध केला जाईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी (दि. २२ एप्रिल) दिली. ते मुंबईत पत्रकारांशी बोलत होते.**



पुढच्या तीन दिवसांत देवस्थान इनाम जमिनींबद्दलच्या कायद्याचा मसुदा सरकारी संकेतस्थळावर सार्वजनिकरित्या उपलब्ध केला जाईल. त्यावर जनतेच्या हरकती, सूचना आणि सुनावणी घेऊन नेमके देवस्थान, कुळधारक आणि वहिवाटदारांचे हक्क काय राहतील? याबद्दलचा सुटसुटीत कायदा तयार जाईल. एक महिन्यात ज्या काही सूचना, हरकती येतील; त्यानुसार अंतिम कायदा तयार केला जाणार असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे. काही ▶▶ पान २ वर

# बारामतीत आज मतदान

बारामती । प्रतिनिधी

**बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी आज गुरूवारी (दि.२३) मतदान होणार असून, त्यासाठी आवश्यक मतदान साहित्य व कर्मचारी संबंधित मतदान केंद्रांकडे रवाना करण्यात आले. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे गोदाम, एमआयडीसी, बारामती येथून ही प्रक्रिया सुरळीत पार पडली.**



या अंतर्गत ४७८ मतदान केंद्रांसाठी ४७८ ईव्हीएम, ९५६ बॅलेट युनिट्स तसेच ४७८ व्हीव्हीपॅट यंत्रे ६० बंदिस्त मिनी टेम्पोद्वारे क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली सुरक्षितपणे मतदान केंद्रांवर पोहोचविण्यात आली. यंदा निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरण प्रक्रियेत बदल करण्यात आला आहे. तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्निल रावडे यांनी सांगितले की, यापूर्वीप्रमाणे मतदान पथकांना डिस्पॅच सेंटरवर न बोलावता ▶▶ पान २ वर

# तर लोकशाही धोक्यात येईल...!

## ममता बॅनर्जी यांच्यावर सर्वोच्च न्यायालयाचे ताशेरे

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

एखाद्या राज्याचे मुख्यमंत्री जेव्हा केंद्रीय तपास यंत्रणेच्या सुरू असलेल्या तपासात स्वतः हस्तक्षेप करतात, तेव्हा त्याला केंद्र सरकार आणि राज्य सरकारमधील सांविधानिक वाद म्हणता येणार नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत तुम्ही कदाचित केवळ अमूर्त कायदेशीर तत्त्वांवर आधारित युक्तिवाद करू शकाल; परंतु राज्यात प्रत्यक्षात घडणाऱ्या वास्तवाकडे न्यायालय डोळेझाक करू शकत नाही. ईडीच्या छाप्यावेळी एका व्यक्तीने (जी मुख्यमंत्री पदावर आहे) केलेले आहे, ज्यामुळे




संपूर्ण यंत्रणा आणि लोकशाही धोक्यात येवू शकते, अशा शब्दांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी (दि. २२) पश्चिम बंगालच्या ▶▶ पान २ वर

# रितेश-जिनिलिया देशमुख एसटीचे ब्रँड अँबेसिडर
## विलासरावांच्या आठवणींना दिला उजाळा

मुंबई । प्रतिनिधी


**रितेश देशमुख आणि जिनिलिया देशमुख यांची एसटी महामंडळाचे ब्रँड अँबेसिडर म्हणून पाच वर्षांसाठी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल आनंद व्यक्त करताना रितेश देशमुख भावूक झाले. त्यांनी आपल्या वडिलांच्या आठवणींना उजाळा दिला.**

"साहेब लातूर-पुणे असा प्रवास एसटीनेच करायचे. त्यांनी परिवहन खातेही सांभाळले होते. आजही बाभळगावच्या घरात



त्यांचा एसटीच्या खिडकीत बसलेला एक फोटो आहे, जो आमच्या कुटुंबासाठी खूप मोलाचा आहे." "एसटी माझ्या आयुष्याचा भाग राहिली आहे. आज तिचाच ब्रँड अँबेसिडर होताना मला सार्थ अभिमान वाटत आहे." प्रताप सरनाईक यांच्या 'व्हिजन'चे कौतुक करताना ▶▶ पान २ वर

# कल्पना खरातचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला



नाशिक । प्रतिनिधी

अशोक खरात प्रकरणात मोठा ट्विस्ट आला आहे. राहाता येथील न्यायालयात बुधवारी अशोक खरातची पत्नी कल्पना खरातच्या अटकपूर्व जामीन अर्जावरील युक्तिवाद पूर्ण झाला असून न्यायालयाने तिचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला आहे. आता कल्पना खरात अटकपूर्व जामीनासाठी हायकोर्टात धाव घेणार का याकडे सर्वांचे लक्ष आहे.

कल्पना खरातच्या अटकपूर्व जामीन अर्जावर राहाता न्यायालयात बुधवारी सुनावणी पार पडली. कल्पना खरातच्यावतीने प्रशांत गिरी तर सरकारी वकील पानगव्हाणे तसेच मुळ फिर्यादी गोंदकर याचे वकील ▶▶ पान २ वर

# माजी सरन्यायाधीश बागेश्वर धामला सहकुटुंब
## राजकीय वर्तुळासह पुरोगामी चळवळीत मोठी खळबळ

दिल्ली । प्रतिनिधी

भारताचे माजी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी मध्यप्रदेशातील प्रसिद्ध आणि तितक्याच वादग्रस्त बागेश्वर धामला सहकुटुंब भेट दिली आहे. त्यांच्या या भेटीमुळे महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीत आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. गवई यांनी पत्नी तेजस्विनी आणि मुलगा ज्योतिरादित्य यांच्यासह बागेश्वर बालाजीचे दर्शन घेऊन धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांचा आशीर्वाद घेतला.

गवई कुटुंबाने बागेश्वर धामवर विधिवत पूजन करून देशाच्या प्रगतीसाठी ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२२ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: १३५.०० क्विंटल | २,१०० | २,६५० | २,२९४ |
| ज्वारी/हायब्रिड: २६५.५० क्विंटल | १,६०० | ३,६०० | २,३९६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ६.०० क्विंटल | ७,४०१ | ७,४०१ | ७,४०१ |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ३०.५० क्विंटल | २,१०० | २,५०० | २,३०० |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १४७.५० क्विंटल | ५,५७५ | ५,६५१ | ५,६१३ |
| हरभरा: १६.०० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |

# जिल्हा रेशम खरेदी केंद्रात राजकीय किडा




सुभाष चौरे । बीड

**२०२३ ते मार्च २६ या तीन वर्षाच्या कार्यकाळात जवळपास ४३ लाख ७८ हजार ४६३ क्विंटल रेशम कोषाची खरेदी करणाऱ्या बीड येथील रेशम खरेदी केंद्राचा या तीन वर्षाच्या कार्यकाळात २०० कोटी पेक्षा अधिक लढाल झालेली असताना, बीड बाजार समितीतील रेशम खरेदी केंद्र गेवराईकडे हलवण्याची चर्चा निरर्थक आहे. विशेषतः या रेशम खरेदी केंद्राच्या जिल्हा कार्यालयाला राजकीय किडा लागल्याची चर्चा जिल्हाभरात सुरू आहे.**

बीड जिल्हा तसा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. परंतु मागील काळामध्ये सिंचन क्षेत्र वाढल्यामुळे ऊसतोड मजूर ऊस बागायतदार झाला. आता सोयाबीन, कापूस, ऊस या पिकाच्याही पुढे जाऊन नगदी पीक म्हणून रेशम पिकाकडे शेतकरी वळल्याचे दिसत आहे. २०२३ ते मार्च २६ या कार्यकाळांमध्ये ४७ हजार २६८ शेतकरी रेशीम शेतीकडे वळल्याचे आकडेवारीवरून दिसत आहे. याच काळात जवळपास ४३ लाख क्विंटल च्या पुढे रेशम कोषाची खरेदी झालेली आहे. २०० कोटी पेक्षा अधिक उलाढाल बीड बाजार समितीमध्ये सुरू असलेल्या रेशीम कोष कार्यालया अंतर्गत झाल्याचे दिसून येते. हे सर्व व्यवस्थित सुरू असताना, हे जिल्हा कार्यालय गेवराई येथे



हलवण्याच्या हालचाली सुरू होत्या मात्र ह्या चर्चा निरर्थक आहेत. गेवराई तालुक्यामध्ये रेशीम कोष तयार करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, हे नाकारता येणार नाही. मात्र त्यामुळे हे कार्यालय जिल्ह्याच्या ठिकाणाहून तालुक्याच्या ठिकाणी स्थलांतरित करणे योग्य नसल्याचेही अनेकांचे म्हणणे आहे. विशेष बाब म्हणजे तात्कालीन उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या कार्यकाळामध्ये त्यांना निवेदन देण्यात आले होते आणि त्याच निवेदनाची प्रोसेस स्थानिक आमदार पाठपुराव्यासह करत होते. मात्र त्याचा मोठा बाऊ केला गेला. आता जिल्हा कार्यालय गेवराईकडे स्थलांतरित होणार मात्र असे काहीही नाही. हा प्रस्तावही राज्याच्या रेशीम कोश विभागाकडे ▶▶ पान २ वर

### रेशम धागा निर्मितीचे सात युनिट

बीड येथील रेशीम कोष खरेदी केंद्र आता शेतकऱ्यांसाठी मोठे वरदान ठरत आहे. बाहेर राज्यातून देखील मोठ्या प्रमाणात व्यापारी येत आहेत. रेशीम कोष खरेदी केंद्र बरोबरच आता जिल्ह्यामध्ये रेशीम कोषापासून रेशमी धागा तयार करण्याचे मोठे युनिट सुरू होत आहे. अंबाजोगाई, होळ, नेकनूर आणि बीड यांसह बीड जिल्ह्यात रेशम धागा निर्मितीचे सात युनिट नव्याने सुरू होत आहेत. त्यांचे कामही अंतिम टप्प्यात असून, त्याला शासन ५०% पेक्षा अधिक अनुदान देखील देत आहे.

### गेवराईला रेशम प्रशिक्षण केंद्र

जिल्हा रेशम खरेदी कार्यालय गेवराईला हलवले जाणार अशी चर्चा होती मात्र जिल्ह्याच्या ठिकाणचे हे कार्यालय कोठेही हलणार नाही. पूर्वी तशी मागणी होती मात्र आता या मागणीला पूर्णविराम मिळाला असून, गेवराईमध्ये अधिक शेतकरी असल्याने त्या ठिकाणी रेशम उत्पादनासंदर्भात प्रशिक्षण केंद्र सुरू केले जाणार असल्याचे समजते. अजितदादा असताना त्यांच्याकडे गेवराईमध्ये हे जिल्हा कार्यालय हलवण्यासंदर्भात पाठपुरावा करण्यात आला होता.

अग्रलेख

# महिला आरक्षण : घोषणांमधील जोश आणि कृतीतील संकोच

महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा देशातील राजकारण तापले आहे. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील आरोप-प्रत्यारोप, विधेयकावरून रंगलेले शाब्दिक युद्ध आणि 'महिलांचे खरे तारणहार आम्हीच' ही दाखवण्याची चढाओढ या सगळ्यामुळे विषयाची गांभीर्य काही काळ बाजूला पडल्याचे चित्र दिसते. प्रत्यक्षात मात्र निवडणुकांमधील उमेदवारी वाटप पाहिले, तर सर्वच पक्षांची भूमिका ही आश्वासनांपेक्षा कृतीत खूपच कमी पडणारी आहे, हे स्पष्ट होते.

नारी शक्ती वंदन विधेयक लोकसभेत नामंजूर झाल्याने महिला आरक्षणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असला, तरी त्यामागील राजकीय गणित अधिक ठळकपणे समोर येत आहे. सत्ताधारी पक्ष विरोधकांवर अडथळे निर्माण केल्याचा आरोप करतो, तर विरोधक सरकारच्या उद्देशांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात. मतदारसंघ पुनर्रचनेचा मुद्दा पुढे करून विधेयकाची अंमलबजावणी पुढे ढकलण्याचा प्रयत्न होत असल्याची टीका होते. या सगळ्या गोंधळात मूळ प्रश्न मात्र कायम आहे. महिलांना प्रत्यक्ष सत्तेच्या केंद्रात किती स्थान दिले जाते.? याच पार्श्वभूमीवर पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांचा आकडेवारीवर आधारित आढावा वास्तवाचे कठोर चित्र समोर आणतो. सामाजिकदृष्ट्या प्रगत मानल्या जाणाऱ्या पश्चिम बंगाल आणि केरळमध्येही महिला उमेदवारांची टक्केवारी केवळ ११ टक्क्यांपर्यंत मर्यादित आहे. तामिळनाडू आणि पदुचेरीत ती १४ टक्के, तर आसाममध्ये केवळ ८ टक्के इतकी आहे. हे आकडे केवळ निराशाजनक नाहीत, तर राजकीय इच्छाशक्तीच्या अभावाचे स्पष्ट द्योतक आहेत. विशेष म्हणजे महिला सक्षमीकरणाचा जोरदार पुरस्कार करणारे पक्षही उमेदवारी देताना मागे पडताना दिसतात. एका बाजूला महिलांसाठी आरक्षणाचा गजर करायचा आणि दुसऱ्या बाजूला तिकिट वाटपात त्यांना दुय्यम स्थान द्यायचे ही दुहेरी भूमिका सर्वच पक्षांकडून दिसून येते. 'जिंकण्याची क्षमता' हा निकष पुढे करून महिलांना संधी नाकारली जाते, पण हा निकष पुरुष उमेदवारांसाठी तितकाच कठोरतेने लागू केला जातो का, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. आणखी एक चिंताजनक बाब म्हणजे उमेदवारी मिळालेल्या महिलांमध्ये मोठ्या प्रमाणावर राजकीय घराण्यांतील महिलांचा भरणा दिसतो. त्यामुळे सर्वसामान्य महिलांना राजकारणात प्रवेश करण्याची संधी मर्यादित राहते. खऱ्या अर्थाने लोकशाही बळकट करायची असेल, तर विविध सामाजिक स्तरांतील महिलांना संधी देणे आवश्यक आहे.लोकसंख्येत महिलांचे प्रमाण जवळपास ५० टक्के असताना त्यांच्या प्रतिनिधित्वाचे प्रमाण १० ते १५ टक्क्यांच्या आसपासच का राहते, हा मूलभूत प्रश्न आहे. अनेक मतदारसंघांमध्ये एकही महिला उमेदवार नसणे ही स्थिती लोकशाहीसाठी लाजिरवाणी आहे. हे चित्र बदलण्यासाठी केवळ विधेयक मंजूर करणे पुरेसे नाही; त्याची तात्काळ आणि प्रामाणिक अंमलबजावणी आवश्यक आहे.

२०२३ मध्ये संसदेत महिला आरक्षण विधेयक मंजूर झाले होते. त्याची अंमलबजावणी त्वरित होणे अपेक्षित होते. मात्र ती पुढे ढकलली गेली. आता पुन्हा नव्या अटी-शर्तीसह ते पुढे आणण्याचा प्रयत्न होत आहे. यामागील राजकीय हेतू लपून राहत नाहीत. महिला सक्षमीकरण हा मुद्दा निवडणूक जिंकण्याचे साधन म्हणून वापरण्याची प्रवृत्ती चिंताजनक आहे. महिलांविषयी अचानक उमटणारे प्रेम, निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वाढणारे आश्वासनांचे सत्र आणि प्रत्यक्षात संधी देताना दिसणारी कचखाऊ भूमिका हा सर्वपक्षीय दांभिकपणा आता महिलांच्या लक्षात आला आहे. आजच्या सुशिक्षित, जागरूक महिला मतदारांना फक्त घोषणांनी फसवणे सोपे नाही. आता गरज आहे ती कृतीची. महिला आरक्षण हा केवळ कायद्याचा विषय नसून सामाजिक परिवर्तनाचा मार्ग आहे. राजकीय पक्षांनी स्वतःहून किमान ३०-३५ टक्के उमेदवारी महिलांना देण्याचा निर्णय घेतला, तर बदलाची सुरुवात होऊ शकते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जसे आरक्षणामुळे महिलांचे नेतृत्व पुढे आले, तसेच चित्र विधानसभांमध्ये आणि संसदेतही दिसणे गरजेचे आहे. 'लाडक्या बहिणी' हा शब्द केवळ भाषणांपुरता मर्यादित न राहता, त्यांना प्रत्यक्ष राजकीय संधी देण्यात दिसला पाहिजे. महिला सक्षमीकरणाच्या घोषणांना अर्थ येईल तो केवळ प्रत्यक्ष सहभागातून. अन्यथा महिला आरक्षणाचा मुद्दा हा केवळ राजकीय नाट्याचा भाग बनून राहील. महिलांना न्याय देण्याची ही वेळ आहे आणि तो न्याय घोषणांनी नव्हे, तर संधी देऊनच मिळू शकतो.

# १५ ऑगस्टपर्यंत रेल्वे सुरू झालीच पाहिजे

## रेल्वे व महामार्ग आढावा बैठकीत खा.सोनवणे यांच्या अधिकाऱ्यांना निर्देश

**बीड । प्रतिनिधी**

**मागील दोन वर्षात रेल्वे कामाला गती दिलेली आहे. आता रेल्वेचे काम युध्द पातळीवर करून १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत पुणे ते परळी रेल्वे धावलीच पाहिजे, शिवाय बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गासहित ग्रामीण मार्गावरील ब्लॅकस्पॉट कमी करण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत, असे निर्देश खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे व राष्ट्रीय महामार्ग आढावा बैठकीत वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले.**



जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन विभागाच्या हॉलमध्ये रेल्वे आणि राष्ट्रीय महामार्ग आढावा बैठकीचे आयोजन केले होते. बैठकीत विविध प्रलंबित कामे, भूसंपादन, निकृष्ट दर्जा, अपघातप्रवण ठिकाणे व नागरिकांच्या अडचणी यांसह सर्वच मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, रेल्वे व राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी उपस्थित होते. खा.बजरंग सोनवणे यांनी बैठकीत अंबाजोगाई, केज, नेकनूर, मांजरसुंबा, पाटोदा व माजलगाव शहरांभोवती बायपास व उड्डाणपूल उभारण्याचा मुद्दा उपस्थित केला. अपघातप्रवण ठिकाणांची तातडीने दुरुस्ती, पिंपळा धायगुडा-लोखंडी सावरगाव-केज-मांजरसुंबा-पाटोदा-चुंबळी फाटा हा रस्ता दुहेरी करणे, तसेच अंबाजोगाईतील यशवंतराव चव्हाण चौकात फूटओव्हर ब्रिज उभारण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. सुरत-चेन्नई राष्ट्रीय महामार्गासाठी आवश्यक भूसंपादनाची सद्यस्थितीही तपासण्यात आली. खरवंडी-मादळमोही-पाडळसिंगी-गढी-माजलगाव मार्गावरील खराब रस्त्यामुळे होत असलेल्या अपघातांबाबत तक्रारी येत आहेत. तालखेड फाटा, शृंगारवाडी फाटा यांसह विविध ठिकाणी तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. माजलगाव-धारूर-केज (रामा ५४८ सी) रस्त्याचा दर्जा अत्यंत खराब असल्याने संबंधित एजन्सीकडून तातडीने दुरूस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. धारूर घाटातील थेटेगव्हाण पर्यायी मार्ग, तसेच बर्दापूर-लोखंडी सावरगाव दुहेरीकरणाच्या निविदांबाबत माहिती घेण्यात आली. पाटोदा व आष्टी तालुक्यातील अंमळनेर-टाकळी काजी तसेच गेवराईतील राक्षसभुवन फाटा-उमापूर-शेवगाव या रस्त्यांना राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.

# माज आणि मस्ती अशीच जर राहिली तर तुम्ही बियाला सुद्धा राहणार नाही...!

## बीड तुरुंगातील ऑडिओ क्लिपनंतर मनोज जरांगे पाटलांचा संताप, थेट इशारा

**धाराशिव । प्रतिनिधी**

**दिवंगत सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणात तुरुगांत अटकेत असलेल्या वाल्मिक कराड आणि त्याच्या साथीदारांकडून कारागृहातील इतर कैद्यांना धमकावल्या जात आहे. बीडच्या कारागृहातील धक्कादायक प्रकार समोर आला असून, वाल्मिक कराड गँगची दहशत पुन्हा वाढल्याची चर्चा रंगली आहे. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले, प्रतीक घुले आणि इतर गुन्ह्यातील आरोपी शंकर शेप यांनी एका कैद्याला मारहाण केल्याचा आरोप आहे. अझर अब्दुल रहमान पठाण असं मारहाण झालेल्या कैद्याचं नाव आहे. विशेष म्हणजे, या ऑडिओ क्लिपमध्ये मनोज जरांगे पाटील यांचंही नाव संबंधिताने घेतलं आहे. त्यावरुन, जरांगे पाटील यांनी संताप व्यक्त करत थेट इशारा दिला आहे.**

व्हायरल होत असलेल्या या ऑडिओ क्लिपमध्ये मनोज जरांगे पाटील यांना गोळ्या घालण्याचा उल्लेख आहे. त्यामुळे हे प्रकरण अधिकच गुंतागुंतीचं बनलं आहे. आता, या ऑडिओ क्लिपवर जरांगे पाटलांनी देखील भूमिका मांडली आहे. बीड कारागृहातील व्हायरल ऑडिओ क्लिपसंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर मनोज जरांगे पाटील यांनी आपली भूमिका आक्रमकपणे मांडली. गोळ्या घालायचं लांब राहिलं तू फक्त मला बघून जा, असं आव्हानच जरांगे पाटलांनी दिलं आहे. तू गोळ्या घालायला तर फक्त ये त्याचे दुष्परिणाम काय असतील हे तुला मग समजेल, ही माज आणि मस्ती आहे. आमचा समाजही मोठा आहे, उद्रेक कशाला म्हणतात, रक्त सांडलं कशाला म्हणतात, हे आणखी एकदा संपूर्ण भारत बघेल, अशा शब्दात जरांगे पाटील यांनी व्हायरल ऑडिओ संदर्भात भाष्य करताना वाल्मिक कराडसह गँगला थेट इशारा दिला आहे. तुझा पाय एकीकडे, हात एकीकडे आणि मुंडक एकीकडे असं झालेलं दिसेल, तू मला फक्त गोळ्या घालून दाखव. तुझं कुणीही राहणार नाही, आमची तेवढी मजबूत एकी आहे. तुमच्याजवळ गोळ्या असतील तर मराठ्याजवळही गोळ्या आहेत. तुम्ही जर गोळ्या घालून आमची लोक मारणार असाल तर आमच्याकडे कुऱ्हाडी आहेत, व येथे सगळं आहे, असे म्हणत जरांगे पाटलांचं नाव घेणाऱ्यांवर मनोज जरांगे पाटलांनी थेट पलटवार केला आहे. तू ये तुला त्यादिवशी कळेल आणि तुझा लाभार्थी टोळीचा मोरक्याही मरेल, तो कुठेही सापडू दे, मुंबईला सापडू दे, पुण्यामध्ये सापडू दे, त्याचेही त्या दिवशी तुकडेच होणार तेही मराठीच करून दाखवणार. मी मराठ्यांना संयमाने ठेवतो पण तुमची माज आणि मस्ती अशीच जर राहिली तर तुम्ही बियाला सुद्धा राहणार नाहीत. तू गोळ्या घालायला ये, त्य दिवशी तुला उद्रेक कळेल, असे जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

# बीड येथील नवीन पंचतारांकित एमआयडीसी संदर्भात आ.क्षीरसागरांनी घेतली उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट

## पुढच्या आठवड्यात होणार मंत्रालय स्तरावर बैठक

**बीड । प्रतिनिधी**

**बीड येथे नवीन पंचतारांकित एमआयडीसी निर्माण करण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांचा नियमित पाठपुरावा सुरू आहे. त्या अनुषंगाने बुधवारी (दि.२२) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन निवेदन दिले. त्यावर उद्योगमंत्री यांनी पुढील आठवड्यात या विषयावर मंत्रालय स्तरावर बैठक आयोजित करण्याचे निर्देश संबंधितांना दिले आहेत.**



बीड हा औद्योगिक आणि शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने मागासलेला जिल्हा आहे. बीड जिल्ह्यात विकास करण्यासाठी बीडमध्ये पंचतारांकित एमआयडीसी होणे ही अत्यावश्यक बाब आहे. जेणेकरून याठिकाणी रोजगार निर्मिती होऊन तरूणांना रोजगार उपलब्ध होईल आणि आर्थिक चालना मिळेल. याबाबत आ.संदीप क्षीरसागर हे मागील अनेक दिवसांपासून शासन आणि प्रशासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत. दरम्यान बीड शहरालगत असलेल्या घोडका राजुरी आणि काठोडा येथे नवीन एमआयडीसी होणेबाबत प्रशासकीय स्तरावर कार्यवाही सुरू आहे. या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन याविषयावर सविस्तर चर्चा करून विषयाचे निवेदन मंत्री महोदयांना दिले. त्यावर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पुढच्या आठवड्यात या संदर्भात बैठक आयोजित करण्याचे निर्देश संबंधितांना दिले असून बीडमध्ये नवीन पंचतारांकित एमआयडीसी होण्याच्या वाटचालीकडे हे मोठे पाऊल असणार आहे.

# उघड्यावर मांस विक्री करणाऱ्या दुकानदारांविरुद्ध कारवाई

## उपायुक्त गिराम रुजू झाल्यापासून झोपले होते का?

जालना । प्रतिनिधी

शहरातील नूतन वसाहत आणि घाटी रोड परिसरातील उघड्यावर मांस विक्री करणाऱ्या दुकानदारांमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर होत असून, भटक्या कुत्र्यांचा उपद्रवही वाढला आहे. जालना महानगरपालिका चे अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम रुजू झाल्यापासून कारवाई करण्याचा निर्णय का घेतला नाही असे बोलल्या जात आहेत. अर्जुन गिराम यांचे कर्मचाऱ्यावर कोणताच वचक नसल्याचे दिसून येत आहे. कोणतेच कर्मचारी गिराम यांचे आदेशाचे पालन करीत नाही. अशीच एक घटना दिव्यांगाची माहिती घेण्यासंदर्भात घडली आहे. या पार्श्वभूमीवर, जालना शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता व अतिक्रमण विभागातर्फे संयुक्त मोहीम राबवून १८ मांस विक्रेत्यांविरुद्ध कठोर कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

नूतन वसाहत येथील उड्डाणपूल ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर आणि घाटी रोड भागात अनेक विक्रेते उघड्यावर चिकन, मटन व मासे विक्री करत असल्याच्या तक्रारी महानगरपालिकेकडे प्राप्त झाल्या होत्या.



उघड्यावरील या मांसामुळे भटके कुत्रे हिंसक होऊन नागरिक व लहान मुलांवर हल्ले करत असल्याचेही निदर्शनास आले आहे. याची गंभीर दखल घेत मा. आयुक्त, जालना शहर महानगरपालिका श्रीमती अंजली शर्मा, यांच्या आदेशान्वये, उपायुक्त श्री. त्र्यंबक कांबळे यांच्या पुढाकाराने ही कारवाई करण्यात आली. अतिक्रमण निर्मूलन: रहदारीस अडथळा निर्माण करणारी दुकानांसमोरील अनधिकृत शेड व अतिरिक्त बांधकामे महानगरपालिकेद्वारे काढण्यात आली आहेत. २४ तासांची मुदत: उर्वरित विक्रेत्यांना स्वतःहून शेड काढून घेण्यासाठी २४ तासांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. मुदतीत कारवाई न केल्यास महानगरपालिका प्रशासनाकडून ती पाडली जाईल. स्वच्छता निकषांचे बंधन: सर्व विक्रेत्यांना शासन निर्देशाप्रमाणे काचेचे कपाट, पडदा किंवा हिरवी जाळी लावूनच मांस विक्री करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. फौजदारी कारवाईचा इशारा: नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि अस्वच्छता पसरवणाऱ्या दुकानदारांविरुद्ध कायदेशीर कारवाई करून पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदवण्यात येतील, असा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आणि शहराच्या स्वच्छतेत अडथळा आणणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध ही मोहीम यापुढेही सुरूच राहील, असे स्वच्छता विभाग प्रमुख यांनी स्पष्ट केले आहे.

# पान १ वरून...

### शेतकरी कर्जमाफीला

मिळणार असल्याचे मानले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुरी येथील प्रचार सभेत बोलताना सांगितले की, ''समितीचा अहवाल सरकारकडे आला आहे. खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वीच कर्जमाफीची अंमलबजावणी करण्याचा आमचा प्रयत्न असेल. जे शेतकरी प्रामाणिकपणे कर्ज भरतात, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, यासाठीही सरकार कटिबद्ध आहे.'' याच पार्श्वभूमीवर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनीही महत्त्वाचे विधान केले आहे. त्यांनी स्पष्ट केले की, कर्जमाफी प्रक्रियेसाठी जरी ३० जून ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली असली, तरी त्यापूर्वीच प्रक्रिया पूर्ण करण्याचा सरकारचा प्रयत्न असेल.ङ्गराज्यातील शेतकऱ्यांवरील वाढत्या कर्जबाजारीपणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक शेतकरी थकीत कर्जाच्या विळख्यात अडकले असून, त्यातून बाहेर पडण्यासाठी केवळ कर्जमाफी नव्हे तर शेतीत मूलभूत सुधारणा आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. याच पार्श्वभूमीवर सरकारने दीर्घकालीन उपाययोजनांवर भर देत उच्चाधिकार समिती गठित केली होती.ङ्गयापूर्वीही राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी विविध कर्जमाफी योजना राबवल्या आहेत. २०१७ मध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना' तर २०१९ मध्ये 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना' राबविण्यात आली होती. या योजनांमुळे अनेक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असला, तरी कर्जमाफीचा प्रश्न अद्याप कायम असल्याचे वास्तव आहे. नवीन अहवालात केवळ कर्जमाफीवर भर न देता शेती क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने उपाय सुचवण्यात आल्याची माहिती आहे. उत्पादन खर्च कमी करणे, बाजारपेठेतील स्थैर्य, पिकविमा सुधारणा, तसेच शाश्वत उत्पन्नाचे स्रोत निर्माण करणे या बाबींवरही विशेष भर देण्यात आला आहे.ङ्गएकंदरीत, समितीचा अहवाल आणि सरकारची भूमिका लक्षात घेता, येत्या काही दिवसांत कर्जमाफीबाबत ठोस निर्णय होण्याची शक्यता असून, खरीप हंगामापूर्वी शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

-------------

### बारामतीत आज मतदान

थेट त्यांच्या संबंधित मतदान केंद्रांवर जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ईव्हीएम यंत्रांसह लिफाफे, फॉर्म्स आणि इतर आवश्यक साहित्य थेट मतदान केंद्रांवर पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी संपूर्ण मतदारसंघ ६० झोनमध्ये विभागण्यात आला असून प्रत्येक झोनसाठी एक क्षेत्रीय अधिकारी नियुक्त करण्यात आला आहे. एकूण ६० क्षेत्रीय अधिकारी असून प्रत्येक अधिकाऱ्याकडे सुमारे ८ ते १० मतदान केंद्रांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच प्रत्येक झोनसाठी स्वतंत्र कंटेनरची व्यवस्था करून त्याद्वारे ईव्हीएम यंत्रांची सुरक्षित वाहतूक केली जात आहे. मतदानासाठी जाणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांपैकी ज्यांच्याकडे स्वतःचे वाहन नाही, त्यांच्यासाठी ये-जा करण्यासाठी ३० बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. सर्व मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करून लोकशाहीतील आपले कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी उत्तम दिघे यांनी केले आहे.

----------

### देवस्थान इनाम जमिनींच्या हस्तांतरणाबाबत

कुळाच्या नावाने जमीन आहेत. काही वहिवाटदारांच्या नावे आहेत. पण त्या देवस्थान इनाम असल्यामुळे या जमिनींचे हस्तांतरण बंद आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबतचा कायदा आणण्यासाठी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार देवस्थान इनाम जमिनींबद्दलचा कायदा आम्ही संकेतस्थळावर प्रसिद्ध करणार असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यातील ४.५ लाख हेक्टर जमीन, विशेषतः कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील ज्या देवस्थानच्या जमिनी हस्तांतरित होत नाहीत. तसेच त्यामुळे विकासकामे अडली आहे अथवा शेतकऱ्याला त्यांच्या जमिनीत काहीच करता येत नाही. त्यासाठी हा कायदा महत्त्वाचा आहे. एक महिन्यात ज्या काही सूचना, हरकती येतील; त्यावर अंतिम कायदा जुलैच्या अधिवेशनात आणणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. देवस्थान इनाम जमिनींचे परस्पर हस्तांतरण आणि व्यवहार झाले आहेत. त्यामुळे एकंदरीत कायदा आणून जे शेतकरी वहिवाटदार आहेत आणि जे जमीन कसतात त्यांच्याबद्दल भूमिका ठरवणे आवश्यक आहे. त्यासाठी विस्तृत कायदा आणि नियमावली केली जात आहे. शेतकरी, देवस्थानचे म्हणणे जाणून घेण्यासाठी एक महिना हा मसुदा खुला जाणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

----------

### रितेश-जिनिलिया देशमुख एसटीचे ब्रँड अँबेसिडर

रितेश यांनी एसटीच्या भविष्यातील बदलांवरही भाष्य केले. एसटी ताफ्यात आता मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक बसेस दाखल होणार असून, संपूर्ण सेवा प्रदूषणमुक्त करण्याचा संकल्प आहे. 'ड्रिंक अँड ड्राईव्ह' मुळे होणारे अपघात टाळण्यासाठी नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचे आवाहन रितेश यांनी यावेळी केले. महाराष्ट्रात रिक्षाचालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयावरून सध्या राजकीय आणि सामाजिक वातावरण तापले आहे. या वादावर आता अभिनेते आणि राज्याचे नवनिर्वाचित एसटी ब्रँड अँबेसिडर रितेश विलासराव देशमुख यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. महाराष्ट्रात मराठी भाषा अनिवार्य असायलाच हवी, असे परखड मत त्यांनी व्यक्त केले आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतलेल्या निर्णयाचे समर्थन करताना रितेश देशमुख म्हणाले, महाराष्ट्रात राहताना आणि प्रवास करताना मराठी बोललीच पाहिजे. ज्याप्रमाणे आपण दुसऱ्या राज्यात गेल्यावर तिथली भाषा आत्मसात करतो, तसेच महाराष्ट्रात मराठीचे महत्त्व असायला हवे. त्यामुळे हा निर्णय पूर्णपणे योग्य आहे.

-----------

### तर लोकशाही धोक्यात

मुख्यमंत्री ममता बॅनर्जीवर ताशेरे ओढले. या प्रकरणाची पुढील सुनावणी उद्यासाठी निश्चित करण्यात आली आहे. तृणमूल काँग्रेसचे राजकीय सल्लागार आय-पॅकच्या कार्यालयावर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) टाकलेल्या छाप्यादरम्यान मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि राज्य पोलिसांनी अडथळा आणल्याचा आरोप ईडीने केला आहे. या प्रकरणी सीबीआय चौकशीची मागणी करणाऱ्या याचिकेवर न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू होती. ईडीच्या दाव्यानुसार, आय-पॅक कार्यालयावर छापा टाकण्यात आला असताना मुख्यमंत्री ममता बॅनर्जी तिथे वरिष्ठ नेत्यांसह पोहोचल्या. त्यांनी अधिकाऱ्यांना धमकावले आणि काही फाईल्स व डिजिटल उपकरणे पळवून नेली. यामुळे तपासात अडथळा निर्माण झाला. याउलट, राज्य पोलिसांनी ईडीच्याच अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केले होते. जानेवारी महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत ईडी अधिकाऱ्यांवरील कारवाईला स्थगिती दिली होती आणि राज्याला त्या दिवसाचे सीसीटीव्ही फूटेज जपून ठेवण्याचे आदेश दिले होते. सुनावणीदरम्यान राज्याच्या वतीने ज्येष्ठ वकील मेनका गुरुस्वामी यांनी असा युक्तिवाद केला की, हा मुद्दा केंद्र आणि राज्यामधील वादाचा आहे. त्यामुळे कलम ३२ ऐवजी कलम १३१ अंतर्गत खटला दाखल व्हायला हवा होता.यावर न्यायमूर्ती मिश्रा यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, ''यामध्ये राज्याचा कोणता अधिकार बाधित झाला आहे? हा केंद्र विरुद्ध राज्य असा वाद नाही. कोणत्याही राज्याचे मुख्यमंत्री तपास सुरू असताना तिथे स्वतः कसे काय जाऊ शकतात? एखादे मंत्री तपासात हस्तक्षेप करून लोकशाही धोक्यात आणत असतील, तर त्याला केंद्र-राज्य वाद म्हणायचे का?'', असा सवालही त्यांनी केला. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी यावेळी कोर्टाला सांगितले की, मुख्यमंत्र्यांनी छाप्याच्या ठिकाणाहून काही गुन्हेगारी पुरावे आणि कागदपत्रेही सोबत नेली आहेत. त्यावर खंडपीठाने म्हटले की, ''हे कृत्य एका व्यक्तीने (जी मुख्यमंत्री पदावर आहे) केलेले आहे, ज्यामुळे संपूर्ण यंत्रणा आणि लोकशाही धोक्यात येईल.''

----------

### माजी सरन्यायाधीश बी.आर.गवईंची

प्रार्थना केली. यावेळी त्यांनी धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्याशी धार्मिक आणि सामाजिक विषयांवर सविस्तर चर्चा केली. गवई यांनी धामातील कॅन्सर रुग्णालय, गुरुकुल आणि संस्कृत शिक्षणाच्या उपक्रमांची पाहणी करून त्यांचे कौतुक केले. सनातन संस्कृती बळकट करण्यासाठी असे उपक्रम महत्त्वाचे आहेत, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. माजी सरन्यायाधीशांच्या या भूमिकेवर काँग्रेस नेते आणि पुरोगामी कार्यकर्ते युवराज मोहिते यांनी अत्यंत कडक शब्दांत टीका केली आहे. ते म्हणाले की, गवई साहेब ज्या सनातन संस्कृतीचे गोडवे गात आहेत, ती संस्कृती असती तर ते आज सरन्यायाधीश झाले नसते. त्यांना हे पद केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि संविधानामुळे मिळाले आहे. मोहिते यांनी पुढे संताप व्यक्त करताना म्हटले की, ज्या बाबासाहेबांच्या नावावर गवईंनी पदे उपभोगली, त्याच विचारांना तिलांजली देऊन ते एका भोंदू बाबाच्या चरणी जात आहेत. बागेश्वर शास्त्रींच्या चमत्कारांचा अनेकदा पर्दाफाश झाला असतानाही एका सर्वोच्च घटनात्मक पदावर राहिलेल्या व्यक्तीने तिथे जाणे, हा संविधानाचा आणि आंबेडकरी चळवळीचा अपमान आहे. एकीकडे महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनाचा लढा तीव्र असताना, दुसरीकडे माजी सरन्यायाधीशांनी अशा प्रकारे धार्मिक व्यासपीठावरून सनातन धर्माचे समर्थन केल्याने नवा वाद निर्माण झाला आहे. याप्रकरणी माजी न्यायमूर्ती गवई यांची काय अधिकृत भूमिका असेल, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

-----------

### कल्पना खरातचा अटकपूर्व जामीन

शुभम गोंदकर यांनी युक्तिवाद केला. फिर्यादीच्या वकिलांनी दावा केली की, या संपूर्ण व्यवहारात अनेक आर्थिक देवाणघेवाणी झाल्या असून, हा प्रकार मनी लॉन्ड्रिंगशी संबंधित असू शकतो. त्यांनी सांगितले की संबंधित एमओयूमध्ये कल्पना खरात यांना दोन टक्के व्याज देण्याचा उल्लेख आहे, त्यामुळे त्यांना या व्यवहारातून आर्थिक फायदा होणार होता. फिर्यादी पक्षाने असा मुद्दाही उपस्थित केला की, ५७ जमिनींपैकी सुमारे ४० टक्के जमिनींवर कल्पना खरात यांचे नाव सातबाऱ्यावर आहे. त्यामुळे त्यांना व्यवहारांची पूर्ण माहिती होती, असा दावा करण्यात आला. तसेच त्या खरेदीखत प्रक्रियेला उपस्थित होत्या आणि नोंदणी कार्यालयात त्यांची उपस्थिती, फोटो आणि अंगठ्याचे ठसे असल्याचे सरकारी वकिलांनी न्यायालयात सांगितले. माझ्या पतीने जर कोणताही गंभीर गुन्हा केला असेल, तर त्यामध्ये माझा कोणताही सहभाग नाही. माझ्याकडून पोलिसांना जप्त करण्यासारखा कोणताही महत्त्वाचा कागद किंवा पुरावा नाही, याकडेही बचाव पक्षाने न्यायालयाने लक्ष वेधले. दरम्यान, तपास अधिकारी निवात जाधव यांनी न्यायालयाला माहिती देताना सांगितले की, कल्पना खरात यांच्या खात्यात तब्बल सात कोटी रुपयांचे व्यवहार झाले आहेत. त्या कोणतीही नोकरी किंवा व्यवसाय करत नसताना एवढी मोठी रक्कम खात्यात कशी आली, याचा तपास करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

----------

### जिल्हा रेशम खरेदी

पाठवला गेल्यानंतर त्यांनी स्थलांतराला विरोध केला असल्याचे समजते. त्यामुळे बीड येथील रेशीम कार्यालय हलवले जाणार म्हणून एका आमदाराकडे बोट दाखवले गेले तर त्याला विरोध म्हणून दुसरे आमदार तयार झाले आणि त्यांनी लागलीच बैठका सुरू केल्या, मग त्यावर राजकीय खल सुरू झाले. रेशीम कोष तयार करण्यासाठी ज्या रेशमच्या पालावर रेशम किडा असतो तो कोश तयार करतो आणि त्यानंतर रेशम धागा तयार होतो मात्र याला आता राजकीय किडा लागल्याने याची चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू झाली. हा राजकीय भाग असला तरी राजकीय नेत्यांनी आपल्या मतदारसंघात, तालुक्यात आणखी काही नवीन प्रयोग करणे गरजेचे आहे. एका ठिकाणचे कार्यालय दुसऱ्या ठिकाणी हलवणे हे कोणालाही योग्य वाटणार नाही. आता हे कार्यालय हलवले जाणार नाही, त्यामुळे त्यावर चर्चाही अधिक करणे योग्य नाही. मात्र अशा शेतकऱ्यांच्या हिताच्या सुरू असलेल्या प्रकल्पामध्ये राजकारण न करता सहकार्याची भावना राज्यकर्ते आणि लोकप्रतिनिधींनी ठेवली तर आपण पश्चिम महाराष्ट्राच्याही पुढे जाऊ, ही भावना राज्यकर्ते आणि राजकीय नेत्यांनी नेहमीच स्मरणात ठेवणे गरजेचे आहे. तसे झाले नाही तर या राजकारणाच्या आणि हेवादाव्या पोटी अनेक प्रकल्प हाताखालून निघून जातील याचे भानही ठेवणे गरजेचे आहे. यासंदर्भात रेशीम कोष अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी देखील पूर्वी तशी चर्चा होती मात्र हे कार्यालय हलवले जाणार नाही असे नमूद केले. जिल्ह्याचे ठिकाण असल्यामुळे शासन तशी परवानगी देत नाही त्याऐवजी ज्या लोकप्रतिनिधींची मागणी असेल त्या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# पार्किन्सन रोग: मेंदूचा न्यूरोडिजेनेरेटिव्ह आजार-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**पार्किन्सन या आजारात रुग्णाला हालचाल, संतुलन व समन्वय राखण्यात अडचणी येतात. पार्किन्सन हा आजार बहुदा वयोमानानुसार वाढत जातो आणि पुरुषांमध्ये त्याची शक्यता स्त्रियांपेक्षा थोडी जास्त असते, असे काही अभ्यासांमधून दिसून आले आहे.**



या रोगात मेंदूतील सबस्टॅन्शिया नायग्रा नावाच्या भागातील डोपामिन निर्मिती करणाऱ्या पेशी नष्ट होतात. डोपामिन हे एक न्यूरोट्रान्समीटर असून, मेंदूतील सिग्नल्सची देवाणघेवाण योग्य पद्धतीने व्हावी यासाठी आवश्यक असते. डोपामिनची पातळी ६० ते ८० टक्क्यांच्या खाली गेली की, पार्किन्सनची लक्षणे प्रकट होऊ लागतात. प्रमुख लक्षणे : हालचालींचा वेग मंदावणे.मांसपेशींतील कडकपणा (रिजिडिटी).संतुलनाचा अभाव व पडण्याची शक्यता वाढणे. चेहऱ्यावर भाव न दिसणे, आवाज मंद होणे यांसह निद्रानाश, बद्धकोष्ठता, लघवीवर नियंत्रण कमी होणे, रक्तदाब अचानक घसरणे, स्मरणशक्ती कमी होणे, औदासिन्यता इत्यादी लक्षणे या आजारात दिसतात. पार्किन्सनचे निदान होण्यासाठी विशिष्ट प्रयोगशाळा चाचणी नाही. याचे निदान मुख्यतः रुग्णाच्या लक्षणांवर व वैद्यकीय तपासणीतून केले जाते. काही प्रकरणांमध्ये एम.आर.आय., डोपामिन ट्रान्सपोर्टर स्कॅन यांचा उपयोग होतो. पार्किन्सनसाठी संपूर्ण इलाज सध्या उपलब्ध नाही, पण औषधोपचारांद्वारे लक्षणांवर नियंत्रण ठेवता येते. फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, चाल सुधारण्यासाठी व्यायाम, आहार व्यवस्थापन, मनोवैज्ञानिक सल्ला यांचा या व्याधीत मोठा फायदा होतो. हा आजार हळूहळू वाढत जातो. सुरुवातीस लक्षणे सौम्य असतात, पण कालांतराने रुग्णाला स्वतःच्या दैनंदिन कामकाजासाठी मदतीची आवश्यकता भासू शकते. पार्किन्सन पूर्णपणे टाळता येत नाही, पण संशोधन दर्शवते की नियमित व्यायाम, आरोग्यदायी आहार आणि विषारी द्रव्यांपासून दूर राहणे या गोष्टी आजाराचा धोका कमी करू शकतात. याबाबत संशोधन अजूनही सुरू असून भविष्यात या रोगावर अधिक प्रभावी उपचार मिळण्याची शक्यता आहे असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि.२३ एप्रिल २०२६



## थोडक्यात

### 'मधुमित्र' व 'मधुसखी' पुरस्कारासाठी ४ मे पर्यंत पुरस्कारांसाठी अर्ज करा

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्यावतीने सन २०२६ साठी 'मधुमित्र' व 'मधुसखी' पुरस्कारांसाठी नामांकन मागविण्यात येत आहेत. मधमाशीपालन व्यवसायाला चालना देणे व मधपालकांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून, गेल्या तीन वर्षांपासून ही योजना राबविण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी आपले अर्ज दि. ४ मे २०२६ पूर्वी संबंधित जिल्हा कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकाऱ्यांनी केले आहे.

क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या यशस्वी मधपालकांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने सन्मानित करण्यात येणार आहे. यातील एक पुरस्कार महिला मधमाळीसाठी राखीव आहे. पुरस्कारांची रक्कम अनुक्रमे प्रथम रु. ११ हजार, द्वितीय रु. ७ हजार व तृतीय रु. ५ अशी आहे. दि. २० मे २०२६ रोजी जागतिक मधमाशी दिन निमित्त पुणे येथे आयोजित समारंभात पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. नामांकन अर्ज मंडळाच्या ु.ीर्ज्ञींळल.ीसऋ या संकेतस्थळावर तसेच जिल्हा खादी ग्रामोद्योग कार्यालयात उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी संपर्क जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, जिल्हा कार्यालय - संपर्क क्र. ८०८७६५६२१६, मधुक्षेत्रिक - ९४०४४९६६२१, संचालक, मध संचालनालय, महाबळेश्वर दू.क्र. ०२१६८-२६०२६४.

### राजाराम जाधव यांचे निधन

बीड । प्रतिनिधी



येथील पत्रकार भीमराव जाधव यांचे वडील राजाराम जाधव यांचे दुःखद निधन झाले. बीड येथील अंकुश नगर भागातील रहिवासी असलेले राजाराम जाधव यांचे २१/०४/२०२६ रोजी दुःखद निधन झाले त्याच दिवशी अंकुश नगर येथील शमशानभूमीमध्ये अंत्यविधी करण्यात आला लोकशाहीर, आण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त होते त्यांच्या पश्चात दोन मुली दोन मुलं नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांची टंचाई आढावा बैठक संपन्न

पाथर्डी । प्रतिनिधी

हवामान खात्याने यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवला आहे प्रत्येकाने आतापासूनच पाण्याचा वापर अत्यंत जपून करावा योग्य नियोजन व खबरदारी न घेतल्यास पुढील वर्षी तीव्र टंचाईला सामोरे जावे लागणार आहे पाण्याच्या उद्भवांवरील अवैध उपसा करणारे बेकायदेशीर प्रकार विशेषतः वीज कंपनीने बेकादेशीर विजपंप विरुद्ध कारवाईचे आदेश जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी दिले पाथर्डी तहसील कार्यालयाच्या मध्यवर्ती हॉलमध्ये पाथर्डी शेवगाव तालुक्यातील सरपंच ग्रामसेवक तलाठी यासह विविध यंत्रणांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त टंचाई आढावा बैठक संपन्न झाली यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते तहसीलदार डॉ.उद्धव नाईक शेवगावच्या गटविकास अधिकारी सोनल शहा नायब तहसीलदार रवींद्र शेकटकर पालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे तसेच विविध यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते यावेळी टंचाई आढावा बैठकीत बोलताना डॉ.पंकज आशिया म्हणाले की तालुक्यातील विविध जलसाठ्यांवर अवैध पाणी उपसा होण्याच्या तक्रारींची गंभीरतेने दखल घेत तात्काळ कारवाई करावी कुठल्याही प्रकारे पाणी साठ्यांचा अपव्यय होणार नाही याची खबरदारी घ्यावी टँकर साठी कुणाच्या शिफारशींची वाट न बघता जिथे टंचाई दिसेल तेथील प्रस्ताव त्वरित सादर करा टँकर मंजुरीचे अधिकार प्रांतअधिकाऱ्यांना देण्यात आल्याने पात्र गावांचे प्रस्ताव मंजूर व्हायला वेळ लागणार नाही पिण्याचे पाणी नमुने तपासण्याची दैनंदिन यंत्रणा आरोग्य विभागाने कार्यरत ठेवावी पाण्याचा अपव्य टाळा टँकरने पाणीपुरवठा होणाऱ्या गावांसाठीचे टँकर भरतीचे फोटो व पाणी वितरणाचे फोटो तारखेसह असावेत. कोणत्याही गावाचे कोणत्याही तारखेचे टँकर चे फोटो अचानक तपासणी दरम्यान योग्य आढळले नाही तर जबाबदार असणाऱ्या विरुद्ध कोणतीही कारण ऐकून न घेता कठोर कारवाई केली जाईल चारा व रोजगार हमीच्या कामाबाबत मागणी येताच गांभीर्याने दखल घेत पडताळणी करावी त्यासाठी आवश्यक त्या कार्यवाही तातडीने करून लोकांची मागणी पूर्ण करण्यासाठी सकारात्मक रहावे अशा सूचना त्यांनी केल्या बैठकीचे प्रास्ताविक व स्वागत तहसीलदार उद्धव नाईक तर आभार प्रांतअधिकारी प्रसाद मते यांनी मानले.

# महिला आरक्षणाला विरोध करुन काँग्रेसने महिलांच्या हक्कांवर आघात केला -मुळूक

## महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिवसेना सदैव कटिबद्ध -संगीताताई ठोंबरे

केज । प्रतिनिधी

महिलांना राजकारणात समान संधी मिळावी, त्यांचे प्रतिनिधित्व वाढावे आणि त्यांचा आवाज सत्तेच्या केंद्रापर्यंत पोहोचावा यासाठी केंद्र सरकारने महिला आरक्षण विधेयक लोकसभेत सादर केले. मात्र काँग्रेसने विधेयकाला विरोध करुन महिलांच्या हक्कांवर आघात केला तर महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिवसेना सदैव कटिबद्ध असल्याचे माजी आमदार संगीताताई ठोंबरे, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले.




महिला आरक्षण विधेयकाला विरोध करणाऱ्या काँग्रेसचा निषेध करण्यासाठी केज येथे भवानी चौकात शनिवारी (दि.१८)शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या आंदोलनात शिवसैनिकांनी काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आपला संताप व्यक्त केला. यावेळी सचिन मुळूक यांनी आपल्या भाषणात काँग्रेसवर टीका केली. ते म्हणाले की, केंद्राच्या महिला आरक्षण विधेयकाला काँग्रेसने याला विरोध करून महिलांच्या प्रगतीत अडथळा आणण्याचा प्रयत्न केला आहे. अशा भूमिकेला जनता कधीही स्वीकारणार नाही आणि योग्य वेळी त्यांना याचे उत्तर दिले जाईल असा इशारा मुळूक यांनी दिला.

या वेळी माजी आमदार संगीता ठोंबरे यांनीही काँग्रेसच्या भूमिकेवर सडकून टीका केली. महिला आरक्षण विधेयक हे महिलांच्या भविष्यासाठी अत्यंत आवश्यक असून, त्याला विरोध करणाऱ्यांविरोधात शिवसेना रस्त्यावर उतरून लढा देत राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

या आंदोलनात महिला आघाडी शहर प्रमुख वैशालीताई सांगळे, शितलताई सोनवणे, मुक्ताताई गडमवार, ज्ञानेश्वरी ताई सांगळे, ज्येष्ठ शिवसैनिक अशोक जोगदंड, डॉक्टर संतोष बुडुक, तालुका सचिव विकास काशीद, उपतालुकाप्रमुख महिंद्र चाटे, उपतालुकाप्रमुख सुग्रीव बसवर, शेतकरी सेना तालुकाप्रमुख आदित्य रांजणकर, विभाग प्रमुख बाबासाहेब डोईफोडे, उपतालुकाप्रमुख योगेश देशमुख, युवा सेना उपतालुकाप्रमुख ज्ञानेश्वर भांगे, संजय गायके, शिवाजी मोहिते, मोहन ढाणे, पोपट लोंढे, संदीप नाईकवाडे, महेश कदम यांच्यासह अनेक पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनादरम्यान शिवसैनिकांनी काँग्रेसविरोधात तीव्र घोषणाबाजी करत निषेध नोंदवला.

## प्राथमिक शाळा पाटेगावला विनोद शिंगाडे यांच्याकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा आणि १००० रुपये भेट

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाटेगाव येथे लोकसहभागामधून अनेक साहित्य वस्तू रुपामध्ये मिळत असताना दिसत आहे. शाळेत राबवल्या जाणारे विविध उपक्रम याचाच हा परिपाक आहे. पाटेगाव येथील प्राथमिक शाळेमध्ये मागील पाच महिन्यापासून तब्बल सव्वा लाख लोकसहभाग वस्तूरूपात जमा झाला आहे. त्यामध्ये शालेय साहित्य संगणक संच,कॅशीओ,विद्यार्थ्यांचे खेळाचे साहित्य,स्पोर्ट्स ड्रेस आणि याबरोबरच इतर शालेय साहित्य यांचा यामध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. यासाठी गावातीलच नाही तर आजूबाजूच्या परिसरातील लोकांनी ही मोठ्या प्रमाणामध्ये



शाळेसाठी स्वतःचे योगदान दिलेले आहे. गावातीलच श्री विनोदजी शिंगाडे यांनी आज शाळेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आकर्षक असणारी प्रतिमा आणि एक हजार रुपये अशी भेट दिली. त्यांच्या बोलण्यामधून शाळेप्रती असणारी आत्मीयता दिसून आली. शाळेसाठी आपण काहीतरी देणे लागतो आणि आपण आपल्या गावातील शाळेसाठी काही का होईना हातभार लावायला हवा या भावनेतून त्यांनी ही मदत केली. खरोखर विनोदजी व्यावसायिक आहेत, त्यांनी त्यांच्याकडून शाळेसाठी केलेली ही मदत निश्चितच इतरांना प्रेरणा देणारी आहे. इतकेच काय परंतु मुलांना पोह्याचा नाष्टा,भरपूर केळी असा भरगच्च खाऊही दिला. यातूनच त्यांच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक कुलथे सर आणि ढेरे मॅडम यांनी त्यांची मनापासून आभार मानले.विनोदजी शिंगाडे यांच्या या लोकसहभागाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळीशालेय समिती अध्यक्ष संतराम जगताप,विनोद शिंगाडे, गोकुळ कदम,पवन कदम, विकास कदम,चंद्रकांत कदम,रतन कदम,दत्ता कदम,अतुल कदम,अमोल आठवले,बबलू कदम नारायण कदम,तेजस शिंगाडे, जगदिश वाघ, धोंडिबा आठवले पाटेगावकर ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### 'हम भारत की नारी है, फूल

शहर उपाध्यक्ष प्रीत कुकडेजा यांच्यासह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ.सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या की, महिलांना राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात समान संधी मिळावी यासाठी केंद्र सरकारने महिला आरक्षणाचा ऐतिहासिक निर्णय घेतला. मात्र, काँग्रेससारखा पक्ष महिलांच्या सक्षमीकरणाच्या विरोधात उभा राहत असल्याचे दुर्दैवी आहे. महिलांच्या हक्कांबाबत केवळ घोषणाबाजी करणाऱ्या काँग्रेसचा खरा चेहरा या भूमिकेतून समोर आला आहे. त्या पुढे म्हणाल्या की, भारतीय जनता पक्ष नेहमीच महिलांच्या सन्मानासाठी आणि सक्षमीकरणासाठी कटिबद्ध राहिला आहे. महिला आरक्षण हा महिलांना राजकारणात मोठ्या प्रमाणात संधी देणारा निर्णय असून, यामुळे देशातील महिलांना नवे बळ मिळणार आहे. काँग्रेसने याला विरोध करून महिलांच्या प्रगतीला अडथळा निर्माण केला असल्याचा आरोप त्यांनी केला. या आंदोलनात भाजप महिला आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### नारी शक्ती वंदन अधिनियम

पांडुळे, बीड तालुका अध्यक्ष गणेश बजगुडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

काँग्रेस सेवा दल प्रदेशाध्यक्ष औताडे म्हणाले, ओबीसींसाठी उप-आरक्षणाशिवाय (-) दिलेले महिला आरक्षण हे केवळ एक पोकळ आश्वासन आहे. या उप-आरक्षणाशिवाय, आरक्षित जागा प्रामुख्याने अशा उच्च जातीय महिलांच्या वाट्याला येतील, ज्या राजकीयदृष्ट्या प्रभावशाली कुटुंबांमधून येतात. आमच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी यापूर्वी असे प्रतिपादन केले होते की, महिला आरक्षण हे मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडले जाऊ नये, तर त्याऐवजी त्याची अंमलबजावणी २०२४ च्या लोकसभा निवडणुकांसोबतच केली जावी. त्यावेळी, महिला आरक्षण लागू करण्यासाठी मतदारसंघ पुनर्रचना करणे आवश्यक असेल, असे उत्तर गृहमंत्री महोदयांनी दिले होते. गृहमंत्री म्हणाले होते: ''लोकसभा निवडणुका पार पडताच, त्यानंतर लगेचच जनगणना केली जाईल; त्यानंतर मतदारसंघ पुनर्रचना होईल आणि त्यानंतर महिला आरक्षणाची अंमलबजावणी केली जाईल.'' परंतु, गेल्या तीन वर्षात नेमके असे काय बिघडले आहे की, आता खुद्द सरकारच असे म्हणत आहे की, पुढील जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेसाठी बराच कालावधी लागेल-अगदी हे दोन्ही विषय पूर्णपणे भिन्न असूनही ? हे स्पष्ट आहे: मोदी सरकार महिला आरक्षणाच्या बाजूने नाही. महिला आरक्षणाला विलंब करण्याच्या उद्देशाने, सरकार वारंवार त्यामध्ये अडथळे निर्माण करत आहे. जी प्रक्रिया अत्यंत सहजतेने पार पाडता आली असती, तिला जाणीवपूर्वक गुंतागुंतीची करून सरकार त्यामध्ये खोडा घालत आहे. जर सरकारने २०२३ मध्ये आमचा सल्ला मानला असता, तर महिला आरक्षण २०२४ मध्येच लागू झाले असते.आज आम्ही पुन्हा एकदा ठामपणे सांगतोः महिला आरक्षणाचा संबंध जनगणनेशी जोडू नका. जर सरकारने संसदेच्या सध्याच्या ५४३ जागांच्या संख्येवर आधारित महिला आरक्षण लागू केले, तर आम्ही तुम्हाला आमचा पूर्ण पाठिंबा देऊ, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी यावेळी जाहीर केली.

### क्रांतिसूर्य संस्थेचा

संजय बागुल सर, सुदर्शन स्वामी, लक्ष्मण पोटभरे, कपिल डोंगरे सर, धम्मानंद बोराडे सर, बाबासाहेब जाधव, कैलास टाकणखार, चंद्रमुनी डोंगरे, संघर्ष डोंगरे सर, संतोष नाना टाकणखारअशोक मगर, शत्रुघ्न कसबे, अश्विन टाकणखार, संकेत लांडगे, संदेश डोंगरे, दिनेश निरर्गध, प्रवीण ओव्हाळ, स्वप्नील स्वामी, सदानंद भैया प्रधान, आजिनाथ लोखंडे, केतन प्रधान, राज सोनवणे, संजोग कसबे, दत्ता सरवदे, राहुल वाघमारे, डॉ. सुहास टाकणखार, दीपक टाकणखार, अभिजीत साळवे, संदेश निरर्गध, सचिनदादा टाकणखार, संदेश लांडगे, रविकिरण टाकणखार, नवनाथ टोडके, नितीन मगर, विशाल टाकणखार, विजय साळवे, सचिन मगर, विलेश कांबळे, बबीराम माने, मुनाजी तुपसुंद्रे, राज कुमारात, नंदकिशोर निरर्गध, रोहन टाकणखार, सुहास टाकणखार, आरव जोगदंड, ऋषिकेश सोनवणे, विशाल सोनवसारे, सुजन खळगे, दीपकदादा गायकवाड, सचिन कराळे, सुजल खळगे, रवीराज भारतसिंह, प्रमोद भद्रे, मिलिंद भागवत, बळीराम जाधव, सिद्धार्थ साळवे, राहुल धाइजे, मानव पोटमारे, शशिकांत घनशामदास, अनिल भारते, उत्कर्ष शिंदे, नवतरस प्रधान, अविनाश गायकवाड, सचिन सिरसट, संजय साळवे, रमेश बल्लाळ, बबलू फंदे, प्रवीण कुव्हारे, सुशिल बोराडे, उत्कर्ष शिंदे

किसन मामा भद्रागे, अमर साळवे, रवी उघडे, सुहास बोराडे, अरविंद ओव्हळ, रवी राऊत, दत्ता येवले, अजिंक्य वाघमारे संस्थेच्या या दूरदृष्टीपूर्ण उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### आरटीओ व महसूल पथकाची वाळू

संबंधितांकडून एकूण ६१,००० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.गेल्या काही दिवसांपासून मंठा शहरातून आणि मुख्य रस्त्यांवरून विना नंबर प्लेट असलेले हायवा ट्रक्स सुसाट वेगाने धावत असल्याच्या तक्रारी नागरिक व प्रसारमाध्यमांकडून करण्यात येत होत्या. या वाहनांचे क्रमांक जाणीवपूर्वक माती किंवा काळया ऑईलने झाकले जात असल्याचे समोर आले होते. या गंभीर बाबीची दखल घेऊन उपविभागीय अधिकारी परतूर श्री पद्माकर गायकवाड व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. बालाजी धनवे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ही विशेष मोहीम राबवली.

ही कारवाई मंठा तहसीलदार श्रीमती सुमन मोरे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे मोटार वाहन निरीक्षक भीमराज नागरे,चालक आसाराम घुले आणि भागवत परिस्कर यांच्या पथकाने केली.अवैध वाहतूक आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर यापुढेही सातत्याने कठोर कारवाई करण्यात येईल. सर्व वाहनधारकांनी रस्ते सुरक्षा नियम पाळावेत आणि नंबर प्लेट स्पष्ट ठेवावी, अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल. बालाजी धनवे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी जालना

## मसापमध्ये भारत सोळंके यांचा सत्कार

माजलगाव । प्रतिनिधी



येथील मराठवाडा साहित्य परिषद शाखेच्या वतीने सोमवारी (दि.२०) २९४ वा 'एक दिवस मराठीचा' या उपक्रमात पीएचडी पदवी मिळवल्याबद्दल भारत सोळंके यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. स्नेहल पाठक होत्या .यावेळी मुकुंदराज सोळंके, किशोर गुंजकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सत्काराला उत्तर देताना भारत सोळंके म्हणाले की, माझ्या घरची परिस्थिती सर्वसाधारण होती. मी सुरुवातीला ट्रक ड्रायव्हर म्हणून काम केले. हे करत असताना मी माझे वाचन सुरूच ठेवले. त्यानंतर घरचा टेम्पो विकून मी पुणे गाठले. त्या ठिकाणी फर्ग्युसन महाविद्यालयात एम.ए. मराठी शिक्षण घेतले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दररोज १४ तास अभ्यास करून पीएचडी पूर्ण केली. यावेळी माजी आमदार मोहनराव सोळंके , मुकुंदराज सोळंके यांनी मला खूप मोलाचे सहकार्य केले. त्यामुळे मी माझी पीएचडी पूर्ण करू शकलो. अध्यक्षीय समारोप करताना प्रा. स्नेहल पाठक म्हणाल्या की, भारत सोळंके यांनी केलेले कार्य अतिशय प्रशंसनीय आहे. त्यासाठी त्यांना खूप संघर्ष करावा लागला. संघर्ष केल्याशिवाय कोणालाही यश मिळवता येत नाही. यावेळी मुकुंदराव सोळंके, मोहन राठोड, प्रा. संगीता जाधव, लता जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालासाहेब झोडगे यांनी केले. सूत्रसंचालन ना.मा. पडलवार यांनी केले तर आभार शरद रांजवण यांनी मानले .यावेळी खेलबा काळे , बालाप्रसाद चव्हाण, कैलास सोळंके, प्रा. हिरामण डावरे, प्रकाश पत्की, अशोक गुंडीबा यांची उपस्थिती होती.

## योगेश्वरी पॉलिटेक्निकमध्ये एआयसीटीईतर्फे दोन नवीन अभ्यास क्रमास मान्यता

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग व आर्टिफिशियल इंटेलिजन्स इंजिनिअरिंग या दोन नवीन अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांच्यातर्फे मान्यता देण्यात आल्याची माहिती प्राचार्य रमण देशपांडे यांनी दिली.ते म्हणाले की,महाविद्यालयात ऑटोमोबाईल इंजिनिअरिंग,मेकॅनिकल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग व सिव्हिल इंजिनिअरिंग हे अभ्यासक्रम शिकवले जातात. या सर्व अभ्यासक्रमांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्यातर्फे उत्कृष्ट नामांकन प्राप्त झाले आहे.योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ.सुरेश खुरसाळे यांच्या संकल्पनेतून वर्ष २०११ मध्ये योगेश्वरी पॉलिटेक्निकची सुरुवात झाली. महाविद्यालयाने पंधरा वर्षाचा टप्पा यशस्वीपणे पूर्ण केला असून,महाराष्ट्रातील नामवंत तंत्रनिकेतन म्हणूनही नावलौकिक मिळवलेला आहे या पॉलिटेक्निकचे अनेक गुणवंत विद्यार्थी महाराष्ट्रात व त्या बाहेर शासकीय अधिकारी, उद्योजक व कुशल अभियंते म्हणून कार्यरत आहेत या महाविद्यालयात विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी रेलचेल असते. दोन नव्या अभ्यास क्रमांना मान्यता मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर,उपाध्यक्ष गणपत व्यास, कार्यकारी उपाध्यक्ष ऍड.जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य, सहसचिव भीमाशंकर शेटे,संचालक प्रताप पवार यांनी अभिनंदन केले आहे.

## रसिक फाउंडेशनने दिला बीडकर श्रोत्यांना नाट्यसंगितानंद

बीड । प्रतिनिधी

रसिक फाउंडेशन,बीड आणि समर्थ सांस्कृतिक मंडळ अंबडच्या वतीने आयोजित 'नाट्यसंगितानंद' केवळ नाट्यपद गायनाच्या कार्यक्रमात रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले.अक्षयतृतीयेनिमित्त रविवार दि १९ एप्रिल रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सायंकाळी ७ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात होते. कार्यक्रमात सुनील कुलकर्णी, विश्वनाथ दाशरथे आणि राजश्री ओक यांनी अनवट नाट्यपदे सादर केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदिका मंगलाताई खाडिलकर यांनी केले.प्रास्तविक महेश वाघमारे यांनी तर स्वागत दीपक कर्नावट यांनी केले.

मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन आणि दीप प्रज्वलित करून प्रत्यक्ष कार्यक्रमास प्रारंभ झाला. पं. प्रभाकर



कारेकर यांचे शिष्य श्री.सुनिल कुलकर्णी यांनी प्रारंभी ' चंद्रिका ही जणू ' हे नाट्यपद सादर केले आणि नंतर 'दे हाता शरणागता ', ' स्वार्थी पसारा ', 'सुकान्त चंद्रानना पातली ' आणि ' श्रीरंगा कमलाकांता ' आणि ' शतजन्म शोधिताना ' ही नाट्यपदे सादर केली तर

पं.विश्वनाथ दाशरथे यांनी 'सोहम हर डमरू बाजे',

'होतो द्वारका भुवनी ', 'ऐ गुलबदन जादु नयन ',

'चांद माझा हा हासरा ', 'परवशता पाश दैवे', आणि ' सुरत पिया की' ही नाट्यपदे गायिली.सौ.राजश्री ओक यांनी 'वद जाऊ कुणाला शरण ', 'ये झणी ये रे माघारी', ' ना तुलना तव वचना ' , ' मधुकर वन वन ', आणि ' मुरलीधर श्याम हे नंदलाल ही नाट्यगीते सादर केली.त्यांना ऑर्गनवर शांतिभूषण देशपांडे आणि तबल्यावर धनंजय जळगांवकर ,गोपाळ खोमणे यांनी सुंदर साथसंगत केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष : महेश वाघमारे ,सचिव: दीपक कर्नावट ,उपाध्यक्ष: मिलिंद सुंदर ,कोषाध्यक्ष : विकास उमापूरकर कार्यकारणी संचालक संस्थापक अध्यक्ष - अमर डागा,डॉ अनुराग पांगरिकर,डॉ प्रसन्न कुलकर्णी,ईश्वर मुथा ,सीए गोपाल मालू, प्रदीप मुळे, वाय जनार्धन राव,

राम मोटवाणी ,लक्ष्मीकांत बाहेगव्हांकर ,विष्णूदास बियाणी ,सुदर्शन धुतेकर मानद संचालक-डॉ अनिल बारकुल,सौ.वासवदत्ता हसेगावकर,सौ.प्रज्ञा बडवे,प्रा दीपक मुळे यांनी प्रयत्न केले.कार्यक्रमास रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मधमाशीचा चावा..

सुप्रसिद्ध निवेदिका मंगला खाडिलकर यांच्या बोटाला कार्यक्रम चालू असतानाच बोटाला मधमाशीने चावा घेतला,मात्र या प्रसंगाचा त्यांनी समयोचित उल्लेख करता त्यांनी धीरोदात्तपणे कार्यक्रम चालू ठेवला, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची दुरवस्था तर आता साऱ्यांना माहीत झाली आहेच पण स्टेजवर मधमाशांचे पोळे असल्याचे पण दिसून आले आहे.

# एल निनोच्या पार्श्वभूमीवर यंदा सरासरीच्या ९२ टक्के पाऊस

## दत्तात्रय भरणे यांची माहिती, खरीप हंगामासाठी १४५.२० लाख हेक्टर पेरणीचे नियोजन

पुणे : खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये सुमारे १४५.२० लाख हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन, भात, मका, तूर, उडीद, कापूस व ऊस या प्रमुख पिकांच्या पेरणीचा लक्षांक निश्चित करण्यात आला आहे. तसेच भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा पर्जन्यमान हे दीर्घकालीन सरासरीच्या ९२ टक्के इतके राहण्याची शक्यता असून, 'एल निनो' स्थितीमुळे पावसात अनियमितता तसेच काही ठिकाणी थोड्याफार प्रमाणात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आवश्यक त्या उपाययोजना राबविण्याचे काम महाराष्ट्र शासन व कृषी विभागामार्फत सुरू असल्याची'' माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.



शिवाजीनगर, बालचित्रवाणी शेजारील नव्याने बांधण्यात आलेल्या सारथीच्या सभागृहात खरीप हंगाम २०२६ च्या नियोजनासंदर्भात कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेनंतर कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणीव साहेब यांनी अर्थसंकल्पात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना घोषित केली असून ३० जुनच्या आत शेतक-यांची कर्जमाफी होणार आहे. या कर्जमाफीसंदर्भातील शेतक-यांची माहिती गोळा करण्याचे व निकष ठरवण्याचे काम अंतिम टप्प्यावर आहे. या कार्यशाळेस राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे, कृषी विभागाचे सर्व उपसचिव, सर्व कृषी विद्यापीठाचे विस्तार संचालक, हवामान विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ, सर्व कृषी संचालक, सर्व विभागीय कृषी संचालक, सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, आत्माचे सर्व प्रकल्प संचालक, सर्व जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी, विद्यापीठाचे शास्त्रज्ञ, कृषी आयुक्तालयातील सर्व सह संचालक व कृषी उप संचालक उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, ''आगामी खरीप हंगाम २०२६ च्या अनुषंगाने राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेत खरीप हंगामासाठी करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. येत्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना खते व बियाणे वेळेत आणि पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हावेत, यासाठी आवश्यक त्या सुचना विभागास दिल्या आहेत.

यंदा एल निनोच्या पार्श्वभूमीवर हवामानाचा अंदाज वर्तवण्यात आला असून त्याचा शेती क्षेत्रावर होणारा संभाव्य परिणाम, पर्जन्यमानाची स्थिती आणि त्यानुसार पीक नियोजनाबाबतही कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली खरीप हंगाम २०२६-२७ यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र शासन व कृषी विभाग शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील. तसेच पुढे माहिती देताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, यावर्षी बियाण्यांची गरज २०.१७ लाख क्विंटल असून २८.०५ लाख क्विंटल (१३९%) बियाणे उपलब्ध आहे. तसेच खरीप हंगाम २०२६ करिता राज्यास ४८.८० लाख मे.टन खतांचे आवंटन मंजूर असून आतापर्यंत २५.१७ लाख मे.टन खते उपलब्ध आहेत. त्यामुळे चालू खरीप हंगामात शेतक-यांना बियाणे व खतांची टंचाई होणार नाही. तसेच खतांच्या आणखी मागणी संदर्भात केंद्र सरकारशी पत्र व्यवहार सुरु आहे. दत्तात्रय भरणे पुढे बोलताना म्हणाले की, भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा देशातील पर्जन्यमान हे दीर्घकालीन सरासरीच्या ९२% इतके राहण्याची शक्यता असून 'एल निनो' स्थितीमुळे पावसात अनियमितता व दुष्काळ परिस्थिती उद्भवू शकते. या पार्श्वभूमीवर कृषी विभागातर्फे राज्यात हवामान प्रतिरोधक बियाण्यांचा वापर, उताराला आडवी पेरणी, बीबीएफ तंत्राचा अवलंब, शेततळ्यांची निर्मिती, मल्चिंग व सेंद्रिय खतांचा वापर तसेच पाणी बचत करणाऱ्या सिंचन पद्धतींवर विशेष भर दिला जाणार आहे. याकरिता महाकृषि ॲपच्या माध्यमातून हवामानास अनुकूल कृषि तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिके कृषि विभागामार्फत घेणे सुरु आहे. तसेच महाविस्तार ॲप, कृषि विभागाचे यु ट्यूब, फेसबुक, एक्स, इन्स्टाग्राम, व्हाट्सॲप चॅनेल या सोशल मिडियाच्या माध्यमातूनही हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे सुरु आहे.

# कृषीकुल आधुनिक शेतीचे विद्यापीठ; देशभरातील शेतकऱ्यांसाठी परिवर्तनाचे केंद्र


## पालघर येथील ४८ शेतकऱ्यांचे यशस्वी दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण

परळी : ग्लोबल विकास ट्रस्टच्या सिरसाळा येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ''कृषीकुल'' शेतकरी प्रशिक्षण केंद्राने आधुनिक व शाश्वत शेतीचे एक प्रभावी आणि आदर्श मॉडेल उभे केले आहे. बीड जिल्ह्यापुरते मर्यादित न राहता हे केंद्र आता संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. परिणामी, येथे प्रशिक्षणासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. पारंपरिक शेतीतून मिळणारे मर्यादित उत्पन्न लक्षात घेता, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, पिक पद्धतीतील बदल आणि नव्या संधींचा शोध अत्यावश्यक ठरतो. याच दृष्टीने ''कृषीकुल'' शेतकऱ्यांना तंत्रशुद्ध, सखोल आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित मार्गदर्शन देत त्यांना सक्षम बनविण्याचे काम करत आहे.

नुकतेच पालघर जिल्ह्यातील ४८ शेतकरी दोन दिवसीय निवासी प्रशिक्षणासाठी कृषीकुल येथे दाखल झाले. या प्रशिक्षणात रेशीम शेतीचे सर्वांगीण मार्गदर्शन देण्यात आले. जमिनीची तयारी, आळी संगोपन, रेशीम शेड उभारणी, व्यवस्थापन, रोग ओळख व प्रतिबंध तसेच कोष संकलन यांसारख्या प्रत्येक टप्प्यावर प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. अल्पभूधारक व आदिवासी शेतकऱ्यांसाठी रेशीम शेती ही उत्पन्नवाढीची प्रभावी संधी ठरू शकते, या उद्देशाने हे प्रशिक्षण विशेष महत्त्वाचे मानले जात आहे. जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून ''प्रति एकरी एक लाखांहून अधिक वार्षिक उत्पन्न'' हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून ग्लोबल विकास ट्रस्ट कार्यरत आहे. आजपर्यंत ५,००० हून अधिक गावांतील ३०,००० पेक्षा जास्त शेतकरी या उपक्रमाशी जोडले गेले असून, सुमारे ७ कोटी फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाला चालना मिळत असतानाच शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही लक्षणीय वाढ होत आहे. सिरसाळा येथील ''कृषीकुल'' हे जागतिक दर्जाचे शेतकरी प्रशिक्षण केंद्र असून, येथे फळबाग लागवड, जल व मृदा संधारणा तसेच रेशीम शेतीचे सखोल व प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश आणि कोकण विभागांसह गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील शेतकऱ्यांनी येथे प्रशिक्षण घेऊन आधुनिक शेतीत यश संपादन केले आहे.



# कांदा संच तयार करण्याची पद्धत



कांद्याची लागवड अनेक प्रकारे केली जाते. योग्य उत्पादन मिळविण्याचे अनेक मार्ग आहेत. यापैकी एक म्हणजे सॅट्स उत्पादन पद्धत. हे एक जुने तंत्रज्ञान आहे, परंतु आजही ते मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. या पद्धतीचा वापर करून शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळते.

कांदा हे नगदी पीक आहे, म्हणून त्याच्या लागवडीला फायदेशीर शेती म्हणतात. बाजारात कांद्याला नेहमीच मागणी असते. त्याच वेळी, कांद्याशिवाय जेवणाची चव मंद राहते. तसेच, कांद्याचा वापर शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही पदार्थांमध्ये केला जातो. कांद्यामध्ये अनेक पौष्टिक आणि औषधी गुणधर्म देखील आढळतात. कांद्याने मधुमेह आणि रक्तदाब नियंत्रित ठेवता येतो. खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामात शेतकरी मोठ्या प्रमाणावर कांद्याची लागवड करतात. पण तुम्ही कांदा संच उत्पादन पद्धतीबद्दल ऐकले आहे का? तुम्ही ऐकले नसेल तर ही पद्धत काय आहे ते आम्ही तुम्हाला सांगत आहोत. तसेच आम्ही तुम्हाला सांगतो की या पद्धतीने शेती केल्यास शेतकरी एका एकरात २० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळवू शकतात. आम्हाला कळू द्या.

उत्पन्न पद्धत काय आहे?: कांद्याची लागवड अनेक प्रकारे केली जाते. योग्य उत्पादन मिळविण्याचे अनेक मार्ग आहेत. यापैकी एक म्हणजे उत्पादन पद्धत. हे एक जुने तंत्रज्ञान आहे, परंतु आजही ते मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. या पद्धतीचा वापर करून शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळते. या पद्धतीत प्रामुख्याने शेतीच्या चार पायऱ्यांचा अवलंब केला जातो. हे चार टप्पे आहेत बीजन तयार करणे, खतांचा वापर, बीजप्रक्रिया आणि पेरणी. या चार पद्धतींनी सेट पद्धतीने कांद्याची लागवड केली जाते.पेरणीची तयारी - मार्चच्या पहिल्या आठवड्यापासून, शेतकरी एन-५३ आणि भीमा डार्क रेड जातीच्या कांद्याची पेरणी करतात. या प्रक्रियेत कांदा पेरताना दिवसभर सूर्यप्रकाश राहील अशा ठिकाणी बेड तयार केला जातो आणि काळजी घेणे सोपे जाते. तसेच, बेडची लांबी तीन मीटर, रुंदी एक मीटर आणि उंची १५ ते २० सेमी असावी.

खताचा वापर - या मशागतीच्या पद्धतीमध्ये पेरणीपूर्वी २० ते २५ किलो कुजलेले शेणखत आणि १०० ग्रॅम मिश्र खत प्रति बेडमध्ये वापरावे. बीजप्रक्रिया- पेरणीपूर्वी बियाण्यास कॅप्टन, बाविस्टिन, थिरम यांसारख्या बुरशीनाशकाची २ किंवा ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्याची प्रक्रिया करावी. बिया कोरड्या भांड्यात ठेवा आणि ते औषधासह हलक्या पाण्याच्या संपर्कात येईपर्यंत ढवळत राहा, जेणेकरून औषध बियांना चांगले चिकटेल. पेरणी- या पद्धतीने शेती करण्यासाठी पेरणीपूर्वी बिया सावलीत वाळवाव्यात. त्यानंतर प्रति बेड १२५ ते १५० ग्रॅम बियाणे पेरणी करावी. अशाप्रकारे खरिपात सुमारे २० क्विंटल प्रति हेक्टर दराने कांद्याचे चांगले उत्पादन घेता येते. पद्धतीमध्ये या चार पद्धतींचा समावेश करण्यात आला आहे ज्याचा वापर करून शेतकरी चांगले उत्पादन घेऊ शकतात. कांदा आता फायदेशीर पीक म्हणून सिद्ध होत आहे, त्यामुळे शेतकरी पद्धतीचा पुरेपूर लाभ घेऊ शकतात.

# दिन विशेष

## जागतिक दिवस

### जागतिक ग्रंथ तथा रचनास्वायत्त दिन

### महत्वाच्या घटना

१६३५ : अमेरिकेतील पहिली सार्वजनिक शाळा बोस्टन लॅटिन स्कूल स्थापन झाली.
१७७४ : ब्रिटीश कमांडर कर्नल चेम्पमेन यांनी रोहिलखंड येथील रोहिला सेनेचा पराभव करून रोहिलखंड आपल्या ताब्यात घेतले.
१८१८ : दोनशे युरोपियन व दोनशे एतद्देशीय शिपायांसह इंग्रज अधिकारी मेजर हॉल यास कर्नल प्रॉयर याने रायगड किल्ल्याची टेहळणी करण्यास पाठविले. चैत्र व. ३
१८९१ : रुस देशाची राजधानी मास्को येथिल यहुदी धार्मिक लोकांना देशाबाहेर काढून देण्यात आले.
१९३५ : युरोपियन राष्ट्र पोल्लंड ने संविधान आमलात आणले.
१९८४ : वैज्ञानिकांनी एड्स या विषाणूचा शोध लावला.
१९९० : नामिबिया संयुक्त राष्ट्रांत प्रवेश होऊन तो १६० वा सदस्य देश बनला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५६४ : विल्यम शेक्सपियर, इंग्लिश साहित्यिक.
१५६४ : विल्यम शेक्सपिअर - इंग्लिश नाटककार आणि अभिनेता. युनेस्कोने घेतलेल्या पुढाकारामुळे विल्यम शेक्सपिअर यांच्या सन्मानार्थ १९९५ पासून आजचा दिवस हा 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जातो. (मृत्यू: २३ एप्रिल १६१६)
१७९१ : जेम्स बुकॅनन - अमेरिकेचे १५ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १ जून १८६८)
१८५८ : मॅक्स प्लँक - नोबेल पारितोषिक विजेते जर्मन भौतिक शास्त्रज्ञ (मृत्यू: ४ आक्टोबर १९४७)
१८५८ : पंडिता रमाबाई - विधवा, परिक्त्यक्ता आणि स्त्रियांच्या सर्वांगीण उद्धारासाठी कार्य करणाऱ्या समाजसुधारक आणि 'आर्य महिला समाज' च्या संस्थापिका, संस्कृत पंडित (मृत्यू: ५ एप्रिल १९२२)
१८७३ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे - अस्पृश्यता निवारण हे जीवनध्येय मानलेले व्यासंगी समाजसुधारक (मृत्यू: २ जानेवारी १९४४)
१८९७ : लेस्टर बी. पिअर्सन = कॅनडाचे १४ वे पंतप्रधान आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: २७ डिसेंबर १९७२)
१९२७ : हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या गायिका व सर्बहार वादक अन्नपूर्णा देवी यांचा जन्मदिन.
१९३८ : एस. जानकी - शास्त्रीय गायिका
२००५ : मी ॲट द झू हा पहिला व्हिडिओ युट्यूब वर प्रकाशित झाला.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६१६ : विल्यम शेक्सपिअर इंग्लिश नाटककार आणि अभिनेता. युनेस्कोने घेतलेल्या पुढाकारामुळे विल्यम शेक्सपिअर यांच्या सन्मानार्थ
१९९५ : पासून आजचा दिवस हा 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जातो. (जन्म: २३ एप्रिल १५६४)
१८५० : विल्यम वर्डस्वर्थ - काव्यातील स्वच्छंदतावादाचे प्रणेते इंग्लिश कवी. त्यांची 'डॅफोडिल्स' ही अतिशय गाजलेली कविता आहे. (जन्म: ७ एप्रिल १७७०)
१९२६ : हेन्री बी. गुप्पी - ब्रिटिश वनस्पतीशास्त्रज्ञ (जन्म: २३ डिसेंबर १८५४)
१९५८ : शंकर श्रीकृष्ण देव - निष्ठावान समर्थभक्त, समर्थ वाङ्मयाचे आणि संप्रदायाचे अभ्यासक व प्रकाशक (जन्म: १० आक्टोबर १८७१)
१९६८ : संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय पटियाला घराण्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय गायक उस्ताद बडे गुलाम अली खान यांचे निधन.
१९७३ : हिंदी आणि ब्रजभाषेतील प्रख्यात कवी आणि लेखक धीरेंद्र वर्मा याचं निधन.
१९९२ : सत्यजित रे - ख्यातनाम चित्रपट निर्माते व दिग्दर्शक आणि भारतरत्न. 'पथेर पांचाली' या त्यांच्या पहिल्याच चित्रपटाला देशविदेशात अनेक गौरव मिळाले. त्यांना विशेष ऑस्कर पुरस्कारही देण्यात आला होता. (जन्म: २ मे १९२१)
२००० : मराठी चित्रपटांना आधार मिळावा या ध्येयाने प्रेरित होऊन गेली ४० वर्षे लालबागमधील 'भारतमाता' चित्रपटगृह चालवणारे यशवंत सदाशिव ऊर्फ बाबासाहेब भोपटकर यांचे निधन.
२००१ : जयंत श्रीधर तथा जयंतराव टिळक - संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे एक नेते, गोवा मुक्ती संग्रामातील एक झुंजार सेनापती, लोकमान्य टिळकांचे नातू, राजकारण, समाजकारण, साहित्य, पत्रकारिता, तत्त्वज्ञान, विज्ञान, निसर्ग आणि शिकार इ. विविध क्षेत्रांमधे दीर्घकाळ सक्रिय असणारे महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष व केसरीचे संपादक (जन्म: १२ आक्टोबर १९२१)
२०१३ : शमशाद बेगम - पार्श्वगायिका (जन्म: १४ एप्रिल १९१९).

# बदलत्या हवामानात पशुधनाची काळजी ; कडुनिंबाचा प्रभावी वापर

यंदाच्या वर्षी उष्णतेत मोठी वाढ झाली आहे. विदर्भ मराठवाड्यात तरी तापमान ४५ अंशांपर्यंत पोहचले आहे. माणसाला नाकीनऊ करून सोडणाऱ्या या उष्णतेचा पशुधनावर देखील परिणाम होऊ शकतो. त्यामुळे उन्हाळयात तुमच्या पशुधनाची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. अन्यथा याचा परिणाम आपल्या दुग्धव्यवसायावर होऊ शकतो.

ह्या गोष्टी लक्षात ठेवा : जनावरांना सावलीत बांधावे आणि पिण्यासाठी थंड व स्वच्छ पाण्याचा पूरवठा करावा. पशुधनाकडून सकाळी ११ ते दूपारी ४ यादरम्यान काम करून घेऊ नये. उष्णतेपासून पशूधनाचे संरक्षण करण्यासाठी गोठ्याच्या छतावर गवताचे आच्छादन करावे. पशुधनाचे शेड पत्र्याचे किंवा सिमेंटचे असल्यास त्याला पांढरा रंग द्यावा. पशुधनास मूबलक प्रमाणात हिरवा चारा, प्रथिनेयूक्त, खनिजमिश्रण आणि मिठयूक्त खाद्य द्यावे. तिव्र उष्णतेच्या काळात पशुधनाच्या अंगावर पाणी शिंपडावे किंवा त्यांना पाणोठ्यावर न्यावे. पशुधनास सकाळी किंवा सायंकाळी चारावयास सोडावे. वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ३० ते ४० कि.मी.) राहून तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्यामुळे, जनावरांना उघडयावर सोडू किंवा बांधू नये. निवाऱ्याच्या ठिकाणी बांधावे व पावसात भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. पशूधनास खुले पाणी, तलाव किंवा नदीपासून दूर ठेवावे, ट्रक्टर आणि इतर धातूंच्या शेती अवजारांपासून दूर ठेवावे व पशुधनास झाडाखाली जमा होऊ देऊ नये. पाऊस चालू होण्याच्या वेळी झाडाच्या आडोशाला थांबु नये.

कडुनिंबाबाचा प्रभावी वापर : पशुधनातील उत्पादनवाढीसाठी त्यांना होणारा गोचीड, गोमाशा, उवा, पिसवा यांचा प्रादूर्भाव कमी करणे आवश्यक आहे. यासाठी उन्हाळा ऋतूमध्ये कडू निंबाच्या वृक्षाच्या पूर्ण पिकून खाली पडलेल्या निंबोळ्या गोळा करून सावली मध्ये वाळवून साठवून ठेवाव्यात व दर महिन्यामध्ये एकवेळ ५% निंबोळी अर्क करून पशुधनास फवारावे.





# उद्योग व्यवसायातील गरजू महिलांना कर्ज अनुदानासाठी कार्यशाळा-हस्तीमल बंब

जालना। प्रतिनिधी

व्यापारी महासंघ जिल्हा जालनाच्या महिला-पुरुष पदाधिकाऱ्यांची बैठकीत प्रास्ताविक करताना अध्यक्ष हस्तीमलजी बंब म्हणाले मागील महिन्यात व्यापारी संघटनेत जालना जिल्हा महिला अधिवेशन राज्यात प्रथमच घेण्यात आले होते. जिल्हयातील सर्व तालुका अंतर्गत ग्रामीण भागात संघटनेची ५० शाखा कार्यरत आहे. त्यात जवळपास ४० शाखा महिला आघाडीची उघडण्यात आलेली आहे. शहरातील विशेष करुण ग्रामीण भागातील प्रत्येक गावातून मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. या अभूतपूर्व ऐतिहासिक अधिवेशनात जिला ग्रामउद्योगच्या प्रमुख व अग्रणी बँकेच्या अधिकारी तसेच व्यापारी संघटना कॅटचे राज्य व राष्ट्रीय पदाधिकारी यांनी मोळाचे मार्गदर्शन केले. महिलांसाठी, ग्रामीण भागासाठी शासनाची अनेक योजना आहे. नाममात्र व्याजाने कर्ज व अनुदान सुध्दा आहे.



मोठ्या प्रमाणावर तरुण मंडळी व्यसनाधीन होत चालेली आहे. बीडी, सिगरेट, तंबाखु, गुटखा व दारु मुळे अनेक कुटुंब उध्वस्त होत आहे. धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय सर्व क्षेत्रात महिलांची कामगिरी उत्कृष्ठ आहे अशा पस्थितीत वाढत चाललेले व्यस्नाधीनता मुळे मोठ्या प्रमाणावर महिला लहान-सहान उद्योग व्यवसाय करुन आपले कुटुंबाचे उदर निर्वाह करत आहे. अधिवेशना मुळे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील होतकरु, कष्टकरी, गरजू महिलानीं अनुदान व कर्जासाठी मोठ्या प्रमाणावर आमऱ्याकडे अर्ज केलेले आहे. त्यात छाननी करून सर्व लागणारे कागदपत्रा सह जिला उद्योग केंद्र आणि बैंक कडे प्रास्ताव दाखल करण्यात आले आहे. काही प्रास्ताव मंजूरीच्या मार्गाने लागले आहे. शेकडो गरजुं महिलांचे आलेले प्रास्तावात लवकर शासकीय व बँकेच्या अधिकारी तसेच उद्योग मंत्रालयातील महिला प्रतिनिधी यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योग व्यवसायात इच्छुक महिलांसाठी कार्यशाळा आयोजित करु. त्यात सर्व लागणारे कागद पत्र बद्दल व उद्योग उभारणीसाठी ट्रेनिंग देण्यात येईल असे बंब म्हणाले. दि २० अप्रैल २०२६ रोजी मंठा रोड येथील नवीन उघडण्यात आलेले हॉटेल महाफुड च्या सभागृहात बैठक घेण्यात आली होती.

प्रथम जिला सचिव प्रविण मोहता यांनी मागील बैठकीचे वृतांत सादर केले. कोषाध्यक्ष अतुल लड्ढा यांनी आवक-जावक हिसोब सादर करुन आपली संघटना नोंदणीकृत असल्यामुळे हिसोब ऑडीट करून धर्मादाय आयुक्ता कडे सादर करु. जिला महिला अध्यक्षा प्रिया जोशी यांनी आलेले प्रास्ताव मंजुरीच्या मार्गी लागत असल्याची महिती सादर केली. सौ. सिता मोहित यांनी गरजू महिलासाठी हा अभियान मराठवाड्याच्या प्रत्येक जिल्ह्यात राबु. सौ. आनंदी अय्यर, सुखदेव बजाज यांनी ही आपले विचार मांडले. नुकतेच श्री बंब यांना मराठवाडा गौरव पुरस्कार मिळल्याने व सकल जैन समाजाचे जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्या बद्दल शाल, श्रीफल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. सत्काराचा उत्तर देतांना बंब म्हणाले मिळालेले पुरस्कार यात आपले सर्वाचे सहयोग आणि कष्ट आहे.

मिळालेले सन्मान पुरस्कार हे माझ्यावर ऋण प्रमाणे आहे, तसेच प्रोत्साहान व प्रेरणा देणार आहे. सर्वांना सोबत घेऊन अधिक जोमाने कार्य करु, अंतिम श्वासा पर्यंत समाजासाठी, गरजुमंदासाठी, व्यापाऱ्यासाठी काम करीत राहीन, असे बंब म्हणाले. या बैठकीसाठी अंकुश राऊत, प्रमोद जोशी, ॲड. सुब्रह्मण्यम अय्यर आदिनीं परिश्रम घेतले. बैठकीचे सुत्र संचालन गोविंद साखला यांनी केले तर आभार राम मोहिते यांनी मांडले. जिला कार्यकारिणीतील अधिकांश पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## कपिलधारवाडी येथे ५ दिवसीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन

बीड। प्रतिनिधी

सर्व भाविक भक्तांना आध्यात्मिक आनंदाची पर्वणी ठरणारा ५ दिवसीय भव्य कीर्तन महोत्सव कपिलधारवाडी येथे आयोजित करण्यात आला आहे. ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या शुभहस्ते व अध्यक्षतेखाली श्री वाघेश्वरी मातांच्या कलशारोहणा वर्धापन दिनानिमित्त हा महोत्सव संपन्न होत आहे.हा कीर्तन महोत्सव शनिवार दि. २५ एप्रिल २०२६ ते बुधवार दि. २९ एप्रिल २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. दररोज सकाळी काकडा भजन, गाथा भजन, सायंकाळी हरिपाठ, रात्री हरिकीर्तन व त्यानंतर हरिजागर असा धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

महोत्सवाच्या दरम्यान विविध नामांकित कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत. शनिवार दि. २५ एप्रिल रोजी ह.भ.प. गणेश महाराज अस्वले बंकटस्वामी मठ संस्थान नेकनुर,



रविवार दि. २६ एप्रिल रोजी ह.भ.प. शुभम महाराज वसंतगडकर, सोमवार दि. २७ एप्रिल रोजी ह.भ.प. मनीषाताई डांगे सोनेसांगवी पुणे, तर मंगळवार दि. २८ एप्रिल रोजी ह.भ.प. भाग्यश्री मोहिते परभणी यांची कीर्तने सेवेचे आयोजित करण्यात आली आहेत. बुधवार दि. २९ एप्रिल रोजी सकाळी१० ते १२ या वेळेत ह.भ.प. गुरु. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सर्व भाविकांनी उपस्थित राहून या पाच दिवसीय कीर्तन महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या महोत्सवासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून ह.भ.प. श्री हरिहारनंद भारती महाराज(मोरेश्वर संस्थान कोळवाडी), विश्वनाथ आप्पा सलगर (श्रीक्षेत्र कपिलधार), दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे(श्री दत्त संस्थान बालाघाट) यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच हरिपाठ, भजन, वाद्य व इतर धार्मिक कार्यक्रमांमध्येही अनेक कीर्तनसेवक सहभागी होणार आहेत. हा भव्य कीर्तन महोत्सव समस्त वाघेश्वरी तरुण मित्र मंडळ व समस्त ग्रामस्थ, कपिलधारवाडी यांच्या वतीने आयोजित करण्यात आला असून, पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संभाजीनगरमध्ये भाजपने मित्रपक्षांची डोकेदुखी वाढवली

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने आतापासूनच जोरदार फिल्डिंग लावायला सुरुवात केली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी जिल्हा प्रभारींची जी नवी यादी जाहीर केली आहे, त्याने महायुतीतल्या मित्रपक्षांची झोप उडवली आहे. कारण भाजपने चक्क उपमुख्यमंत्री एकनात शिंदे यांची शिवसेना आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रवादीचे आमदार ज्या मतदारसंघात आहेत, तिथे आपले मोठे नेते प्रभारी म्हणून पाठवले आहेत. यामुळे विधानसभा निवडणुकीत अद्याप मोठा अवधी असला तरी भाजपने आपली ताकद दाखवायला सुरुवात केल्याची चर्चा रंगू लागली असून भाजपने स्वबळाच्या दृष्टीने टाकलेलं हे पहिलं पाऊल असल्याचं बोललं जात आहे.

भाजपकडून घेण्यात आलेल्या नव्या निर्णयामध्ये सगळ्यात जास्त चर्चा होत आहे ती म्हणजे संभाजीनगर पश्चिम मतदारसंघाची. हा मतदारसंघ सध्या शिंदेंच्या शिवसेनेचे संजय शिरसाट यांच्याकडे आहे. पण भाजपने तिथे प्रभारी म्हणून थेट प्रीतम मुंडे यांची नियुक्ती केली आहे. पंकजा मुंडे लोकसभेला पराभूत झाल्यानंतर आता त्यांच्या भगिनी प्रीतम मुंडे यांना थेट शिरसाटांच्या मतदारसंघात पाठवणे, हा भाजपचा चेकमेट प्लॅन असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. यामुळे शिंदेंच्या शिवसेनेच्या गोटात अस्वस्थता वाढण्याची शक्यता आहे.भाजपने संपूर्ण मराठवाड्यासाठी मिशन ८ ची आखणी केली आहे. यात मोठ्या नेत्यांना टार्गेट दिलं असून माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांना लातूरला पाठवलं आहे, तिथे काँग्रेस आणि राष्ट्रवादीची ताकद आहे. तर राहुल लोणीकर यांना संभाजीनगर ग्रामीणची जबाबदारी दिली आहे .तसेच चैतन्य बापू देशमुख यांच्याकडे शहराची सूत्रे दिली आहेत.साधारणपणे असं ठरलेलं असतं की ज्याची जागा त्यालाच मिळावी. पण भाजपने ज्या ठिकाणी मित्रपक्षांचे आमदार आहेत, तिथे आपले दिग्गज नेते प्रभारी म्हणून नेमल्यामुळे जागावाटपावेळी पेच निर्माण होणार की भाजपकडून ही स्वबळाची तयारी सुरू आहे, अशी कुजबूज रंगत आहे.दरम्यान, निवडणुकीपूर्वीच भाजपने सुनेत्रा पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या पक्षासमोर मोठं आव्हान उभं केलं आहे. एकूणच काय तर, ही केवळ पक्षबांधणी नसून मित्रपक्षांना दबावात ठेवण्यासाठी केलेली ही रणनीती असल्याचा आरोप होऊ लागला आहे. ज्या ठिकाणी मित्रपक्ष कमजोर असेल तिथे भाजप आपला उमेदवार घुसवण्याच्या तयारीत असल्याचं या नियुक्त्यांवरून दिसत आहे.

## निवृत्तीनंतर चहासाठीही पुरत नाही पेन्शन; शिक्षकांचा सरकारवर संताप

### खुर्च्या रिकाम्या, शाळांना कुलूप अन् सरकारी कार्यालये ठप्प

जामखेड । प्रतिनिधी

आमदार आणि खासदारांनी एकदा शपथ घेतली की त्यांना आयुष्यभर पेन्शन मिळते, मात्र ३०-३० वर्षे प्रामाणिक सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पेन्शन नाकारली जाते, ही मोठी शोकांतिका आहे. सध्या निवृत्त कर्मचाऱ्यांना केवळ १५०० ते १८०० रुपये पेन्शन मिळतेय. वाढत्या महागाईत ही रक्कम चहापाण्यासाठीही पुरणार नाही, मग घरखर्च कसा चालवायचा?'' असा सवाल माध्यमिक शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष सुदाम वराट यांनी उपस्थित केला.

जुनी पेन्शन योजना लागू करण्यासह इतर प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवारपासून पुकारण्यात आलेल्या राज्यव्यापी बेमुदत संपात जामखेड तालुक्यातील महसूल, आरोग्य, शिक्षण आणि इतर विभागांतील कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. या आंदोलनामुळे तालुक्यातील प्रशासकीय यंत्रणा पूर्णपणे कोलमडली असून शाळा आणि सरकारी कार्यालयांत शुकशुकाट होता. सकाळी



१० वाजता तालुक्यातील माध्यमिक शिक्षक ल. ना. होशिंग विद्यालयात एकत्र जमले. तेथून 'एकच मिशन, जुनी पेन्शन'च्या घोषणा देत सर्व कर्मचारी तहसील कार्यालयावर धडकले. समन्वय समितीचे अध्यक्ष तथा तहसीलदार मच्छिंद्र पाडळे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या संपा मुळे तालुक्यातील महसूल, कृषी, आरोग्य आणि शिक्षण विभागाचे कामकाज पूर्णपणे ठप्प झाले होते. भरती बंदी आणि कामाचा ताण शिक्षकेतर संघटनेचे तालुकाध्यक्ष संतोष देशमुख यांनी यावेळी कर्मचाऱ्यांच्या व्यथा मांडल्या. ''एकीकडे जुनी पेन्शन नाही आणि दुसरीकडे नवीन कर्मचारी भरतीही बंद आहे. यामुळे सध्याच्या कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण येत आहे. सरकारने कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण करावे आणि रिक्त पदे तातडीने भरावीत,'' अशी मागणी त्यांनी केली. या आंदोलनात माजी अध्यक्ष पी. टी. गायकवाड, संतोष पवार, झाकीर शेख, भागवत चांगुणे, अमोल भोंडवे, हनुमंत वराट, भाऊसाहेब इथापे, रामेश्वर धुमाळ, अर्जुन रासकर, सुनील घाडगे, मयूर भोसले, विशाल पोले, आदित्य देशमुख, दिनकर सरगर, बुवासाहेब दहिकर, बाबासाहेब धनवडे, नंदकुमार गव्हाणे आदी सहभागी झाले. मागण्या मान्य झाल्याशिवाय खुर्चीवर बसणार नाही एकच मिशन जुनी पेन्शन यासह दीर्घकाळ आंदोलन, संप आणि निवेदनांनंतरही शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप करत कर्मचाऱ्यांनी आता निर्णायक लढ्याची तयारी सुरू केली आहे. आता मागण्या मान्य झाल्याशिवाय खुर्चीवर बसणार नाही,'' असा निर्धार समन्वय समितीच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

## अल्पवयीन मुलीस फुस लावुन पळून गेलेला आरोपी पिडीतेसह ताब्यात

जालना। प्रतिनिधी

पोलीस ठाणे बदनापुर हद्योतील एका १४ वर्षीय पिडीत मुलीस एका ३३ वर्षीय नराधमाने दिनांक ११/०४/२०२६ रोजी पळवून नेले होते. त्यावरुन पोलीस ठाणे बदनापुर येथे गुरनं. १५९/२०२६ कलम १३७(२) भा.न्या.सं. प्रमाणे दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्हयातील आरोपी अनिल भिमराव रत्नपारखे रा.वंजार उम्रद ता.जि. जालना याने सदर मुलीस फुस लावून पळवून नेल्याचे निष्पन्न झाले होते. सदर आरोपी हा पिडीत मुलीसह सुकळी ता. नेवासा जिल्हा अहिल्यानगर येथे असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला प्राप्त झाली होती. त्यावुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक १६/०४/२०२६ रोजी सुकळी



या गावाचे परिसरात जावुन आरोपी व पिडीत मुलीस ताब्यात घेवुन पुढील तपास कामी पोलीस ठाणे बदनापुर येथे हजर केले आहे.सदरची कारवाई श्री. अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक, श्री. आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक, श्री. अनंत कुलकर्णी, उप विभागीय पोलीस अधिकारी,श्री. पंकज जाधव पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. यांचे मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार कैलास खाडे, किशोर पुंगळे, महिला पोलीस अंमलदार अरुणा गायकवाड, गोदावरी सरोदे यांनी केली आहे.

## फसवणुक करुन ट्रॅक्टर घेवुन फरार आरोपी पकडला

जालना। प्रतिनिधी

सोनालीका ट्रैक्टर शोरुम जालना येथुन एका दिवसाकरीता डेमो घेण्यासाठी घेवुन गेलेले ट्रॅक्टर विश्वासघात व फसवणुक करुन फरार झालेल्या कलीम बेग सलीम बेग मिर्झा रा. कस्तुरवाडी ता. बदनापुर जि. जालना यास ताब्यात घेवुन त्याचेकडुन ९ लाख रुपये किंमतीचे सोनालीका कंपनीचे ट्रॅक्टर पोलीसांनी जप्त केले आहे.

त्याबाबत सविस्तर वृत्त असे की, चंदनझिरा परीसरामध्ये सोनालका ट्रॅक्टरचे शोरुम आहे. सदर शोरुम मध्ये तक्रारदार अर्जुन रमेश लोखंडे हे मालक आहेत. मागील एक महीन्यापुर्वी दिनांक १३/०३/२०२६ रोजी आरोपी नामे कलीम बेग सलीम बेग मिर्झा रा. कस्तुरवाडी ता. बदनापुर जि. जालना हा शोरुम वर आला व त्याने ट्रॅक्टर खरेदी करायचे आहे असे सांगुन शोरुम मधुन एक दिवसाचा ट्रायल डेमो घेण्यासाठी एक नवे कोरे ट्रॅक्टर एक दिवसाकरीता घेवुन गेला होता. त्याबाबत त्याने शोरुम मध्ये करार करुन दिला होता. आरोपीने करार करुन दिल्याने शोरुमचे मालक



यांनी त्याचेवर विश्वास ठेवुन त्यास एक दिवसाच्या ट्रायलसाठी ट्रॅक्टर दिले होते. आरोपी ट्रॅक्टर घेवुन गेल्याचे नंतर एक दिवसाची मुदत संपल्यावर देखील तो ट्रैक्टर परत घेवुन आला नाही. ट्रॅक्टर परत न आल्याने तक्ररदार शोरुम मालक यांनी आरोपी कलीम बेग सलीम बेग मिर्झा रा. कस्तुरवाडी ता. बदनापुर जि. जालना यास संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु संपर्क झाला नाही तसेच त्याचा शोध घेवून देखील तो किंवा ट्रैक्टर मिळुन आले नाही. आपला विश्वासघात होवुन फसवणुक झाल्याचे तक्रारदार यांचे लक्षात येताच त्यांनी दोन दिवसांपूर्वी पोलीस ठाणे चंदनझिरा गाठुन आरोपी विरुध्द तक्रार दिली होती.एक दिवसाकरीता ट्रॅक्टर घेवुन जावुन परत न करणे ही अंत्यत गंभीर बाब असल्याने पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी तपास अधिकारी रवी देशमाने यांना आरोपीचा शोध घेवुन त्याचे कडुन ट्रॅक्टर जप्त करण्याच्या सुचना केल्या होत्या.

त्यावरुन पोउपनि देशमाने यांनी व त्यांचे पथकाने फरार आरोपीचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले. ताब्यात घेतल्यावर त्याने पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे दिली पण त्याला पोलीस खाक्या दाखवीताच त्याने ट्रॅक्टर घेवुन गेला असल्याचे सांगीतले व लपवून ठेवलेले ट्रॅक्टर हजर केले ते पोलीसांनी जप्त केले आहे. सदर कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपानी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी जालना श्री. अनंत कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे चंदनझिराचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांच्या पथकाने कारवाई केली

## योगेश्वर शिवलिंग व दुर्गा भवानी मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा



मंठा। प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील क्षेत्र योगीधाम बुगानाईक तांडा दहिफळ खंदारे सोमवार ता. २० रोजी श्री योगेश्वर शिवलिंग व दुर्गा भवानी मूर्ती प्राणप्रतिष्ठा, कलश रोहन सोहळा, नवचंडी पाठ व होम हवन यज्ञ संत महंतांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

परमपूज्य तपस्वी श्री योगानंद महाराजांच्या मार्गदर्शनाखाली आणि परमपूज्य महंत १००८ स्वामी विश्वेश्वरानंद गिरी महाराज (मठाधिपती संस्थान पांगरी गोसावी) तसेच परम पूज्य महंत १०८ श्री विठ्ठल गिरी महाराज (गोखुरेश्वर संस्थान) यांच्या शुभहस्ते कलश रोहन करण्यात आले. यावेळी भाविक भक्तांनी संत महंतांचे दर्शन घेतले.भजन कीर्तनाने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते.परमपूज्य तपस्वी श्री योगानंद महाराजांनी उपदेश देताना सांगितले की, भगवंताच्या भक्तीचा एकमेव मार्ग म्हणजे संत होय. ज्या ठिकाणी संत महंतांचे वास्तव्य असते, जेथे तप ध्यान अनुष्ठानाची जागा आहे त्या ठिकाणी हिंसा (बळीदान) करता येत नाही असे परमपूज्य महाराजांनी सांगितले. हरिनामाने मनुष्याचे जीवनाचे सार्थक होते असे म्हणाले. याप्रसंगी पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. समस्त बुगा नाईक तांडा व भूरा नाईक तांडा येथील ग्रामस्थांनी या सोहळ्याचे आयोजन केले होते. आरती नंतर सर्व भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# नारी शक्ती वंदन अधिनियम या कायद्याला काँग्रेसचा विरोध नाही या विधेयकाआडून भाजपचा छुपा अजेंडा- विलास औताडे

बीड । प्रतिनिधी

सद्यस्थितीत ५४३ जागांच्या लोकसभेत जर या कायद्याची अंमलबजावणी केली गेली, तर महिलांसाठी अंदाजे १८१ जागा राखीव राहतील. सध्याच्या लोकसभेत केवळ सुमारे ७४ महिला खासदार असल्याने, १०० हून अधिक विद्यमान पुरुष खासदारांना आपल्या जागा सोडाव्या लागतील. सर्वाधिक जागा भाजपच्या ताब्यात असल्याने, विद्यमान पुरुष खासदारांच्या संदर्भात भाजपलाच सर्वाधिक नुकसान सोसावे लागेल. जर



याच्या अंमलबजावणीला तोपर्यंत पुढे ढकलले, जोपर्यंत लोकसभेच्या जागांची संख्या वाढून ८५० होत नाही, तर पक्ष नव्याने निर्माण होणाऱ्या मतदारसंघांमध्ये महिला उमेदवारांना सामावून घेऊ शकेल; आणि असे करताना कोणत्याही विद्यमान पुरुष खासदाराला (खासदारकीवरून) दूर करण्याची आवश्यकता भासणार नाही. महिला आरक्षणाचा संबंध मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडण्यामागे हेच खरे कारण आहे. नारी शक्ती वंदन अधिनियम हा कायदा म्हणून यापूर्वीच संमत करण्यात

### विधेयक महिला आरक्षणासाठीचे नाही

**सरकारच्या विधेयकांवरून हे स्पष्ट होते की, हे विधेयक महिला आरक्षणासाठीचे नाही. उलट, हे विधेयक देशात चोरवाटेने मतदारसंघ पुनर्रचना लागू करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आले आहे. मोदी सरकारचा खरा उद्देश मतदारसंघ पुनर्रचना हाच आहे ही अशी एक प्रक्रिया आहे जिच्यावर केवळ महिला आरक्षणाचे लेबल लावले गेले आहे. एक गोष्ट आता पूर्णपणे स्पष्ट झाली आहे.**

### मोदी सरकार चे धोरण सामान्यांसाठी नाहीत

**मोदी सरकार हे ना महिला आरक्षणाच्या बाजूने आहे, ना जात-आधारित जनगणनेच्या. २०२३ मध्ये, मोदी सरकारने असे स्पष्ट केले होते की, जनगणना केली जाईल, त्यानंतर मतदारसंघ पुनर्रचना होईल आणि त्यानंतरच महिला आरक्षण लागू केले जाईल. २०२६ मध्ये, मोदी सरकार आता असे म्हणत आहे की, जनगणना होण्या पूर्वीच महिला आरक्षण लागू करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. या मधल्या काळात जो एकमेव फरक दिसून आला आहे, तो म्हणजे- आघाडी आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या दबावामुळे-मोदी सरकारला जात जनगणना करण्यास भाग पडले.**

आला आहे आता पुन्हा अधिनियमासाठी भाजपाने जाहीर करावे आमचा पाठिंबा असेल, अशी स्पष्ट भूमिका काँग्रेस सेवादल प्रदेशाध्यक्ष विलास औताडे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

बीड शहरामध्ये जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने बुधवारी महिला महाविद्यालय येथे पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते यावेळी काँग्रेस सेवा दल प्रदेशाध्यक्ष औताडे बोलत होते. यावेळी जिल्हा काँग्रेस अध्यक्ष राहुल सोनवणे, राऊत, जिल्हा काँग्रेस महिला अध्यक्ष मीनाक्षी ◀◀ पान ३ वर

# लव्ह जिहादच्या घटनेने माजलगाव हादरले; अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

**संपूर्ण राज्य लव्ह जिहादच्या घटनांनी हादरले असताना याचे लोण ग्रामीण भागातही पसरले आहे. माजलगाव शहरातील एका कॅफे मधे मुलीवर अतिप्रसंग करताना एका युवकाला हिंदू तरुणांनी पकडले. चौकशी केली असता सदरील लव्ह जिहादचे प्रकरण असल्याचे निष्पन्न झाले असून मुलावर गुन्हा दाखल करण्या साठी पीडित मुलीच्या आईने पोलीस स्टेशन गाठून मुला विरुद्ध रीतसर तक्रार दिली आहे.**

माजलगाव शहरात ग्रामीण भागातील अनेक मुली शाळा व महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी येतात. सदरील पीडित

### आरोपी विरोधात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल

मुलगी ग्रामीण भागातील असून सुंदरराव सोळंके महाविद्यालयात इयत्ता अकरावी मध्ये शिक्षण घेत आहे. मुलीचे आई वडील मजुरी करतात. महाविद्यालयात शिक्षण घेत असताना पीडित मुलीच्या मैत्रणीने आरोपी सोबत ओळख करुन दिली.एकमेकांना शैक्षणिक साहित्याची देवाण घेवाण करण्याच्या माध्यमातून मैत्रिणीने सदरील मुलीला एका कॅफे मधे बोलावून घेतले. संबंधित मुलगी कॅफे मध्ये गेली असता तिथे तिला तिची मैत्रीण भेटली नाही परंतु तिथे आरोपी रहमत अलीम शेख आधीच बसला होता. त्याने पीडित मुलीला पकडून तिच्या सोबत अति प्रसंग करण्याचा प्रयत्न केला असता कॅफेतील काही तरुणांच्या ध्यानात ही गोष्ट येताच त्यांनी त्या मुलाच्या तावडीतून मुलीला सोडवले व पोलिसांना पाचारणं केले. पोलिसांनी मुलाला ताब्यात घेतले. मुलीच्या आईच्या फिर्यादीवरून आरोपी रहिमत आली शेख राहणार इंदिरानगर माजलगाव याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता ७४,७५,७९ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायदा ८,१२, १२६(२) नुसार गुन्हा दाखल झाला आहे.

### 'हम भारत की नारी है, फूल नहीं चिंगारी है'च्या घोषणा

# महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्या काँग्रेसविरोधात बीडमध्ये भाजप महिला आघाडीचे आंदोलन

### काँग्रेसने महिलांच्या प्रगतीला अडथळा निर्माण केला -डॉ.सारिकाताई क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

महिला आरक्षणाच्या प्रश्नावर काँग्रेसने घेतलेल्या विरोधी भूमिकेच्या निषेधार्थ भाजपच्या महिला आघाडीच्यावतीने बीडमध्ये बुधवारी (दि.२२) सकाळी १०:३० वाजता आंदोलन करण्यात आले. भाजपच्या बीड नगरपरिषदेच्या गटनेत्या तथा नगरसेविका डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली हे



आंदोलन पार पडले.

"हम भारत की नारी है, फूल नहीं चिंगारी है", "काँग्रेसचा धिक्कार असो" अशी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह जिल्हा सरचिटणीस मीराताई गांधले, अ‍ॅड.संगीता धसे, नगरसेविका समीक्षा शेटे, भाग्यश्री देशपांडे, भाग्यश्री तांबारे, संध्या मिश्रा, ◀◀ पान ३ वर

### माजलगावात विजेचा शॉक बसून वृद्धाचा मृत्यू

माजलगाव । प्रतिनिधी

विजेचा जोरदार शॉक बसल्याने एका वृद्ध



व्यक्तीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दि २२ एप्रिल बुधवार रोजी घडली.प्राथमिक माहितीनुसार,अचानक घराजवळ असलेल्या तारेचा करंट लागल्याने ही दुर्घटना घडली.

मधुकर विनायकराव तौर असे मयत झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. कुटुंबीयांनी तातडीने त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती मृत घोषित केले,अशी माहिती आहे.या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.संबंधित यंत्रणांकडून घटनेची नोंद घेण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# प्रहारच्या ठोस पाठपुराव्याला यश; माजलगाव नगरपरिषदेकडून दिव्यांगांना ३,७६,५०० चे वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील दिव्यांग नागरिकांच्या प्रलंबित हक्कांसाठी प्रहार संघटनेने केलेल्या सातत्यपूर्ण व ठोस पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून, माजलगाव नगरपरिषदेकडून एकूण २५१ दिव्यागं बांधवांना प्रत्येकी १५०० रूपये प्रमाने ३,७६,५०० इतक्या निधीचे वाटप दिव्यागं बांधवांचा बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहे. या निर्णयामुळे अनेक दिव्यांग कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून दिव्यांग लाभार्थ्यांचे आर्थिक सहाय्य रखडले होते. यामुळे लाभार्थ्यांना दैनंदिन गरजा भागवताना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन प्रहार संघटनेने नगरपरिषद प्रशासनाकडे वारंवार निवेदने, पाठपुरावा व चर्चाद्वारे प्रश्न लावून धरला. अखेर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत निधी मंजूर करून वितरणाची प्रक्रिया पूर्ण केली.




या अंतर्गत २५१ पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना थेट आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. या मदतीमुळे त्यांच्या वैद्यकीय उपचार, दैनंदिन खर्च आणि जीवनमान उंचावण्यासाठी मदत होणार आहे. निधी वाटप करताना पारदर्शकता राखून पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात आल्याचेही नगर परिषद दिव्यांग प्रमुख मा.कमलाकर लांबे यांच्या कडून स्पष्ट करण्यात आले.

प्रहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त करत, दिव्यांग बांधवांना त्यांचे हक्क वेळेत मिळावेत यासाठी आम्ही सातत्याने लढा देत राहू, अशी भूमिका मांडली. तसेच अजूनही काही पात्र लाभार्थी लाभापासून वंचित असल्यास त्यांनाही तातडीने मदत देण्याची मागणी माजलगाव प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाध्यक्ष गोपाळ बाबुराव पैंजणे यांच्या वतीने करण्यात आली आहे.

दरम्यान, नगरपरिषद प्रशासनाने दिव्यांगांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आश्वासन माजलगाव नगर परिषद मुख्य अधिकारी मा सुंदर बोदंर यांनी दिले आहे. या सकारात्मक निर्णयामुळे शहरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, माजलगाव प्रहारच्या पाठपुराव्याची सर्वत्र चर्चा होत आहे.

### आरटीओ व महसूल पथकाची वाळू माफियाच्या १० विना नंबर वाहनावर कारवाई



जालना । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील पूर्णा नदीपात्रातून होणारी अवैध वाळू वाहतूक आणि विना नंबर प्लेट धावणाऱ्या हायवा वाहनांबाबत प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची दखल घेत, उप प्रादेशिक परिवहन विभाग व महसूल विभाग यांच्या संयुक्त पथकाने आज, दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी धडक कारवाई केली. या मोहिमेत विना नंबर प्लेट वाळू वाहतूक करणाऱ्या एकूण १० वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, ◀◀ पान ३ वर

# सचिन ढाकणे अपघात प्रकरणात वाचवण्यासाठी तडजोडीची चर्चा

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील खरवंडी पाथर्डी लोहा कंधार ३६१ एफ राष्ट्रीय महामार्ग रोडवर झालेल्या भीषण अपघातात हायवार्ड या चारचाकी गाडीने मोटरसायकलवर चाललेल्या तिघांना अर्धा किलोमीटर गाडीखाली चिरडत नेले या गंभीर अपघातात मालेवाडी येथील शेतकरी कुटुंबातील ऊसतोडमजूर असलेल्या आशाबाई शिवाजी दराडे वय ५२ यांचा अहिल्यानगर येथील खाजगी साईदीप हॉस्पिटल येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला तर मनीषा रमेश दराडे व सचिन शिवाजी दराडे या अपघातात गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर साईदीप हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत.

आरोपी शिक्षक सचिन ढाकणे याने दारू पित

सुसाट गाडी चालवून घेतला आशाबाईचा जीव !

ढाकणवाडी येथील सुधाकर ढाकणे नामक निवृत्त शिक्षकाचा व मोठ्या पैशावाल्या धनीशेठचा पोऱ्या असलेल्या शिक्षक सचिन ढाकणे याने रविवारी सायंकाळी ५ ते ५:३० वाजण्याच्या सुमारास दारू पिऊन चार चाकी गाडी सुसाट वेगाने चालवून ऊसतोड मजूर असलेल्या आशाबाई शिवाजी दराडे यांचा अपघातात जीव घेतला तर मनीषा रमेश दराडे व सचिन शिवाजी दराडे यांना गंभीर जखमी केले आहे असे तेथील प्रत्यक्षदर्शनी नागरिकांनी सांगितले आहे.

आरोपी नामे सचिन ढाकणे याच्याकडे गाडी चालवण्याचे वैध लायसन नसल्याचे कळत आहे तसेच सचिन ढाकणे हा दारू पिऊन गाडी चालवत होता आरोपी सचिन ढाकणे याला पोलिसांनी अद्याप पर्यंत अटक केली नसल्याने आरोपी सचिन ढाकणे हीट अँड रन कलम १०६(१) व २ नुसार पोलिसांना शरण न जाता फरार झाल्याने सदोष मनुष्यवधाच्या शिक्षेस पात्र होऊ शकतो परंतु अटक न करण्यासाठी आरोपी सचिन ढाकणे याने लाखो रुपयांची तडजोड केल्याची चर्चा आहे मोटार वाहन कायदा १९८८ नुसार निष्काळजीपणे दारू पिऊन गाडी चालवणे व निष्पाप व्यक्तीचा अपघातात जीव घेणे यानुसार आरोपी सचिन ढाकणे यास पोलिसांनी तातडीने अटक करावी अशी मागणी आहे.

# जिल्ह्यात बेमुदत संपाचा दुसरा दिवस शासकीय कार्यालयांत शुकशुकाट

बीड । प्रतिनिधी

राज्य सरकारी , निमसरकारी , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपाचा आज दुसरा दिवस असून जिल्ह्यातील बहुतांश शासकीय कार्यालयांमध्ये आजही पूर्णपणे शुकशुकाट दिसून आला . महसूल विभागासह विविध विभागातील कर्मचारी संपात सहभागी झाल्याने तहसील कार्यालये , उपविभागीय कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात कामकाज ठप्प झाले असून नागरिकांना विविध




सेवांसाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे .

जुन्या पेन्शन योजनेसह प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभर सुरू असलेल्या या आंदोलनाला बीड जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे . जिल्ह्यातील सर्व कर्मचारी संघटनांनी एकत्र येत आंदोलन तीव्र केले असून अनेक ठिकाणी धरणे आंदोलन सुरू आहे . तहसील कार्यालयांसमोर कर्मचारी बसत घोषणाबाजी करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# धक्कादायक: जात प्रमाणपत्रासाठी १५०-२०० कुटुंबांचे सामुदायिक आत्मदहन

**माजलगाव प्रशासनाच्या वेळकाढू धोरणाचा कडेलोट! उपविभागीय कार्यालयासमोर होणार 'सामुदायिक आत्मदहन'**

**माजलगाव । प्रतिनिधी**

स्वतःच्या हक्काच्या जात प्रमाणपत्रासाठी गेल्या १० महिन्यांपासून प्रशासनाचे उंबरठे झिजवूनही पदरी निराशाच आल्याने, आता महादेव कोळी समाजाने टोकाचे पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला आहे. प्रशासनाच्या आडमुठ्या आणि वेळकाढू धोरणाचा निषेध म्हणून येत्या २३ एप्रिल २०२६ रोजी माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर समाजबांधव 'सामुदायिक आत्मदहन' करणार आहेत. याबाबतचे खळबळजनक निवेदन पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांना देण्यात आले आहे.

माजलगाव उपविभागीय कार्यालयात ३० जून २०२५ पासून महादेव कोळी समाजाच्या जात प्रमाणपत्रांच्या फायली पडून आहेत. मंडल अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या चौकशी अहवालानंतरही मा. उपविभागीय अधिकाऱ्यांकडून हे दाखले देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, ज्यांच्या रक्ताच्या नात्यात (वडील, आजोबा) आधीच प्रमाणपत्रे मिळाली आहेत, त्यांच्याच मुलांना किंवा नातवांना आता दाखले नाकारले जात असल्याने समाजात तीव्र असंतोष पसरला आहे.

आश्वासनांची गाजरे आणि फसवणूक

यापूर्वी ८ दिवस आमरण उपोषण केल्यानंतर, मा. डऊज साहेबांनी 'एक महिन्यात प्रमाणपत्र देऊ' असे आश्वासन दिले होते. मात्र, १० महिने उलटूनही अद्याप १५० ते २०० प्रमाणपत्रे प्रलंबित आहेत. प्रशासनाने आमचा शब्द पाळला नाही, उलट कार्यालयात हेलपाटे मारायला लावून आमची मानसिक आणि आर्थिक पिळवणूक केली आहे, अशी संतप्त भावना निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.

### 'न्याय द्या, अन्यथा जीव घ्या'

**जात प्रमाणपत्र मिळत नसल्याने मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे आता 'न्याय द्या, अन्यथा जीव घ्या' अशी भूमिका समाजाने घेतली आहे. २३ एप्रिल २०२६ पर्यंत जर सर्व प्रलंबित प्रमाणपत्रे मिळाली नाहीत किंवा लेखी स्वरूपात ठोस निर्णय दिला नाही, तर सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनामुळे माजलगाव तालुक्यात खळबळ उडाली असून, आता प्रशासन यावर काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

# क्रांतिसूर्य संस्थेचा स्तुत्य उपक्रम चिंचगव्हाण विहाराला बुद्ध मूर्ती भेट

माजलगाव । प्रतिनिधी

क्रांतिसूर्य बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने बौद्ध जयंतीनिमित्त चिंचगव्हाण (माजलगाव) येथील बौद्ध विहारास भगवान गौतम बुद्धांची मूर्ती भेट स्वरूपात देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे प्रमुख विश्वस्त अश्विन टाकणखार व संदेश डोंगरे यांनी दिली.






संस्थेने यापूर्वी सावरगाव व किट्टी आडगाव येथेही बुद्ध मूर्ती भेट देऊन सामाजिक व धार्मिक कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या उपक्रमाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर यावर्षी बाभळगाव, वडवणी तसेच चिंचगव्हाण (माजलगाव) येथे मूर्ती भेट देण्याचा निर्णय संस्थेने घेतला आहे. हा उपक्रम केवळ धार्मिक आणि सांस्कृतिक नसून बौद्ध संस्कृतीची जागृती, सामाजिक एकात्मता आणि बंधुभाव वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. किट्टी येथील बौद्ध विहारात मूर्ती स्थापनेसाठी विशेष पूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमास गावकरी व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

मार्गदर्शक: ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# २७ तास अन् १२ लाख, ज्येष्ठ नागरिकाला 'डिजिटल अरेस्ट' करण्याचा डाव फसला; सतर्कता कामी



पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

पिंपरी- चिंचवड पोलिस आयुक्तालयांतर्गत निगडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका तरुणाला 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली सायबर गुन्हेगारांनी फसवण्याचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे. मात्र, कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकाच्या सतर्कतेमुळे हा प्रकार वेळेत उघड झाला आणि तब्बल १२ लाख रुपयांची फसवणूक टळली. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास संबंधित तरुणाला व्हॉट्सअॅप कॉलद्वारे अज्ञात इसमाने संपर्क साधला. समोरील व्यक्तीने स्वतःला मुंबई पोलिसांच्या क्राईम ब्रँचमधील अधिकारी असल्याचे भासवले. त्याने तरुणाच्या नावावर एक पार्सल पकडण्यात आल्याचे सांगत, त्या पार्सलमध्ये पाच पासपोर्ट आणि एमडी ड्रग्ज आढळल्याचा दावा केला.

यानंतर तुम्हाला वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर चौकशीसाठी हजर राहावे लागेल, असे सांगून तरुणाला भीती दाखवण्यात आली. पुढे 'सिग्नल' अॅप डाउनलोड करण्यास सांगून व्हिडिओ कॉलद्वारे चौकशी सुरू करण्यात आली. कॉलदरम्यान पोलिस वर्दीत असल्याचे भासवणाऱ्या बनावट अधिकाऱ्यांनी 'डिजिटल अरेस्ट' केल्याचे सांगत, कोणालाही माहिती देऊ नये अशी धमकी दिली. सुमारे २७ तास चाललेल्या या प्रकारात आरोपींनी तरुणाकडून त्याचे बँक खाते आणि आधारकार्डची माहिती मिळवली. तसेच 'क्लिअरन्स सर्टिफिकेट' देण्यासाठी बँक खात्यात पैसे जमा करण्यास सांगितले. या भीतीपोटी संबंधित तरुणाने आपल्या म्युच्युअल फंडमधून १२ लाख रुपये काढण्याची तयारी केली होती. दरम्यान, तरुणाने ही बाब आपल्या वडिलांना सांगितली. त्यांच्या वडिलांनी तत्काळ सावधगिरी बाळगत निगडी पोलिस ठाण्यातील पोलिस अंमलदार सोपन बोधवड यांच्याशी संपर्क साधला. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप केला. सोपन बोधवड, मुंकूद वारे आणि महिला पोलिस अंमलदार स्नेहा मस्के यांनी पीडिताच्या घरी जाऊन त्याला आणि त्याच्या पत्नीला योग्य मार्गदर्शन केले. त्यामुळे हा 'डिजिटल अरेस्ट'चा प्रकार उघडकीस आला आणि मोठी आर्थिक फसवणूक टळली.

पिंपरी -चिंचवड पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या संकल्पनेतून ज्येष्ठ नागरिक व गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती मोहीम राबवली जात आहे. याच मोहिमेमुळे संबंधित ज्येष्ठ नागरिकांना या प्रकाराची जाणीव झाली आणि त्यांनी वेळीच पोलिसांशी संपर्क साधला, असे त्यांनी सांगितले. 'डिजिटल अरेस्ट' अशी कोणतीही संकल्पना अस्तित्वात नाही. कोणताही पोलिस अधिकारी व्हिडिओ कॉलद्वारे अटक करत नाही. अशा प्रकारचे कॉल किंवा संदेश आल्यास घाबरून न जाता तत्काळ जवळच्या पोलिस ठाण्यात किंवा सायबर पोलिसांशी संपर्क साधावा. तसेच आपल्यासोबत सायबर फसवणूक झाल्यास १९३० या हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी

# अजितदादांच्या अपघाताबाबत माझ्याही शंका; बारामतीत सुनेत्रा पवार भावूक



बारामती । प्रतिनिधी

पोटनिवडणुकीच्या सांगता सभेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिवंगत अजित पवार यांच्या निधनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत सखोल चौकशीची मागणी केली. अपघाताबाबत जशा तुमच्या मनात शंका आहेत, तशाच माझ्याही मनात आहेत. त्या दूर व्हायलाच हव्यात, असं त्या भावूक होऊन म्हणाल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या या सभेत बोलताना त्यांनी सांगितले की, या प्रकरणी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन चर्चा केली आहे. केंद्र आणि राज्य सरकारने सखोल तपासाचे स्पष्ट निर्देश दिले असून, सत्य समोर यायलाच हवे आणि दोषींना कठोर शिक्षा झाली पाहिजे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

भाषणादरम्यान अजित पवारांविषयी बोलताना सुनेत्रा पवार यांना अश्रू अनावर झाले. त्यांनी त्यांच्या स्मृती जपण्यासाठी बारामतीत भव्य स्मारक आणि संग्रहालय उभारण्याची घोषणाही केली. दादांच्या आयुष्याचा संपूर्ण प्रवास यात मांडला जाईल, असं त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी बारामतीकरांना आश्वासन देताना सांगितले की, अजितदादांनी सुरू केलेली विकासकामे पूर्ण केली जातील. पाणी योजना, शाळा, आरोग्य सुविधा आणि कॅन्सर रुग्णालयासारखी स्वप्ने पूर्ण करण्यासाठी मी अहोरात्र काम करेन. बारामती माझं कुटुंब आहे. दादांप्रमाणेच तुमचा विश्वास जपण्याचा प्रयत्न करेन, असे भावनिक आवाहन करत त्यांनी मतदारांचा पाठिंबा मागितला.

# नवले पूल चौकात अपघातांचे सत्र सुरूच; भरधाव कंटेनरने ४ वाहनांना उडवले

पुणे । प्रतिनिधी

**पुणे-बेंगळुरू महामार्गावरील नऱ्हे येथील नवले पूल परिसर पुन्हा एकदा भीषण अपघाताने हादरला आहे. गुरुवारी (२२ एप्रिल) दुपारी दोन वाजेच्या सुमारास एका भरधाव कंटेनरने नियंत्रण सुटल्याने चार वाहनांना जोरदार धडक दिली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, कात्रजकडून देहूरोडच्या दिशेने जाणाऱ्या एका वेगवान कंटेनरचे ब्रेक फेल झाल्यामुळे किंवा चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात घडला. या कंटेनरने महामार्गावरून जाणाऱ्या दोन चारचाकी आणि दोन दुचाकी वाहनांना धडक दिली. अपघाताचा आवाज होताच परिसरातील नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. धडक इतकी भीषण होती की वाहनांचा चक्काचूर झाला, मात्र चालकांनी प्रसंगावधान राखल्याने आणि एअरबॅग्जमुळे प्रवाशांचे प्राण वाचले. नवले पूल आणि नऱ्हे सेल्फी पॉइंट परिसर संपूर्ण देशात 'ब्लॅक स्पॉट' म्हणून कुप्रसिद्ध झाला आहे. तीव्र उतार आणि चालकांचा वेगावरील ताबा सुटणे ही यामागची प्रमुख कारणे सांगितली जातात. गेल्या काही वर्षांत येथे शेकडो छोटे-मोठे अपघात झाले असून अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. प्रशासनाने येथे रंबल स्ट्रिप्स, गतीरोधक आणि वेगमर्यादेचे फलक लावूनही अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाहीये. गुरुवारी झालेल्या या अपघातामुळे महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. सिंहगड रस्ता पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. वारंवार होणाऱ्या या अपघातांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट असून, या मृत्यूच्या सापळ्यावर कायमस्वरूपी उपाययोजना कधी होणार? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

# शिरूर तालुका नशामुक्तीसाठी तहसिलसमोर आठव्या दिवशीही सत्याग्रह; पोलिस प्रशासनावर निष्क्रियतेचे आरोप



**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर शहर व परिसरातील बिघडलेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या स्थितीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच शिरूर तालुका नशामुक्त करण्याच्या मागणीसाठी येथील तहसिल कार्यालयासमोर सत्याग्रह आंदोलन करणारे सामाजिक कार्यकर्ते नीलेश वाळूंज यांनी आंदोलनाची तीव्रता वाढविण्याचा इशारा आज दिला. दरम्यान, सत्याग्रह आंदोलनाच्या आठव्या दिवशी वाळूंज यांची आई, पत्नी व दोन्ही मुलींनी आज आंदोलनस्थळी थांबून दिवसभर अन्नत्याग केला.

शिरूर शहर व परिसरातील वाढती गुन्हेगारी, तरूणाईभोवती पडलेला एमडी चा विळखा, हातभट्टी दारूचे पेव, अवैध धंदे, जुगार, मटका, चोऱ्या, दादागिरी, भाईगिरी आणि वाढत्या गुन्हेगारीकडे शासनाचे व विशेषतः पोलिस प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याकामी कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीच्या मागणीसाठी नीलेश वाळूंज गेल्या बुधवार (ता. १५) पासून तहसिल कार्यालयासमोर ठिय्या देऊन बसले आहेत. या सत्याग्रह आंदोलनाला विविध संघटनांचा पाठिंबा वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर वाळूंज यांची आई मंदा, पत्नी अश्विनी, तसेच मुली नक्षत्रा व मान्यता यांनी आज आंदोलनस्थळ गाठले. अन्नत्याग करून दिवसभर त्या आंदोलनात सहभागी झाल्या. वाळूंज यांचे गाव असलेल्या अण्णापूर (ता. शिरूर) येथील कपिल घावटे, संजय कुरंदळे, प्रदीप दसगुडे, भाऊसाहेब शिंदे, जयश्री कानडे यांनीही आंदोलनस्थळी भेट देऊन सत्याग्रह आंदोलनाला पाठिंबा दिला.

आंदोलनकाळात प्रांताधिकारी विठ्ठल जोशी, तहसिलदार बाळासाहेब म्हस्के यांच्यासह शिरूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले, शिरूरचे पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांनी वाळूंज यांची भेट घेऊन मागण्यांबाबत चर्चा केली. मात्र, हे प्रश्न वरिष्ठ पातळीवरील असल्याने जिल्हाधिकारी तसेच जिल्हा पोलिस अधिक्षकांनी दखल घ्यावी, अशी भूमिका वाळूंज यांनी मांडल्याने आंदोलनातून मार्ग निघू शकला नाही. दरम्यान, जिल्हा पोलिस अधीक्षक संदिपसिंह गिल यांनीही भ्रमणध्वनीद्वारे वाळूंज यांच्याशी त्यांच्या मागण्यांबाबत चर्चा केली. एक - दोन दिवसांत गिल हे शिरूरला येऊन नागरीक हिताच्या या समस्यांबाबत चर्चा करतील, अशी अपेक्षा आहे. तसे न झाल्यास स्थानिक नागरीक, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांना सोबत घेऊन आंदोलनाची व्याप्ती वाढविली जाईल, असा इशारा वाळूंज यांनी दिला.

# तोतया पोलिसांकडून दोन ज्येष्ठांचे दागिने लंपास

पुणे : 'पोलिस अधिकारी तपासणी करत आहेत, तुमच्या गळ्यातील दागिने काढून ठेवा,' अशी बतावणी करत तोतया पोलिसांनी दोन ज्येष्ठ नागरिकांना सुमारे अडीच लाख रुपयांचा गंडा घातला. नऱ्हे आणि पाषाण सूस रस्ता परिसरात या घटना घडल्या. या दोन्ही गुन्ह्यांमधील आरोपी एकच असण्याची शक्यता आहे.

नऱ्हे येथील झील कॉलेज चौकाजवळ एका ज्येष्ठ नागरिकास (वय ७५, रा. नऱ्हेगाव) दोन दुचाकीस्वारांनी गाठले. 'साहेबांनी तुम्हाला थांबायला सांगितले होते, तुम्ही का थांबला नाही? तुमच्या गळ्यातील सोनसाखळी कोणीतरी हिसकावून घेईल, ती काढून ठेवा,' असे सांगून त्यांना घाबरवले. ज्येष्ठ नागरिकाने त्यावर विश्वास ठेवून ९० हजार रुपये किमतीची सोन्याची साखळी कागदात बांधून गाडीच्या डिक्कीत ठेवली. मात्र, हातचलाखी करून चोरट्यांनी ती साखळी चोरून नेली. ही घटना सोमवारी रात्री सव्वादहा वाजता घडली. याप्रकरणी नऱ्हे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या घटनेत, पाषाण सूस रस्त्यावरील रिलायन्स मार्टजवळ एका ज्येष्ठ महिलेची (वय ७५, रा. पाषाण) फसवणूक झाली. दोन तोतया पोलिसांनी त्यांना अडवून, 'पुढे काही महिलांच्या सोनसाखळ्या चोरीला गेल्या आहेत, तुमची चेन व्यवस्थित काढून ठेवा,' असे सांगितले. ज्येष्ठ महिलेने त्यांची पावणेदोन लाख रुपयांची चेन कागदात बांधून त्यांच्याकडे दिली. मात्र, चोरट्यांनी नजर चुकवून बनावट अंगठ्या असलेला कागद त्यांना देत मूळ दागिने घेऊन पळ काढला. ही घटना मंगळवारी (ता. २१) सकाळी साडेआठ वाजता घडली. याप्रकरणी बाणेर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# पुणे-मुंबई एक्सप्रेस-वेवर दोन दिवस 'मेगाब्लॉक'; दुपारी १२ ते ३ या वेळेत वाहतूक पूर्णपणे बंद

पुणे । प्रतिनिधी

मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. डोंगरगाव आणि कुसगाव दरम्यान असलेल्या पुलाच्या देखभालीचे काम हाती घेण्यात आल्यामुळे आगामी २३ आणि २४ एप्रिल रोजी या मार्गावरील वाहतूक प्रत्येकी तीन तासांसाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (चडठऊळ) कि.मी. क्र. ५८/५०० येथे पुलाचे शटरिंग काढणे आणि रंगकामाचे नियोजन करण्यात आले असून, सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आला आहे.



या नियोजित कामामुळे २३ एप्रिल २०२६ रोजी मुंबईकडे जाणारी वाहतूक दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत पूर्णतः थांबवण्यात येईल. या काळात प्रवाशांना पर्यायी मार्गाचा वापर करावा लागणार असून, सर्व वाहने किवळे, देहूरोड आणि तळेगाव मार्गे राष्ट्रीय महामार्ग ४८ वरून कुसगाव टोल प्लाझा येथे वळवण्यात येतील. त्यानंतर २४ एप्रिल रोजी पुण्याकडे येणाऱ्या मार्गावर दुपारी १२ ते ३ या वेळेत असाच ब्लॉक घेण्यात येणार आहे. पुण्याकडे येणारी वाहने कुसगाव टोल प्लाझावरून राष्ट्रीय महामार्ग ४८ कडे वळवून देहू रोड आणि किवळे मार्गे पुन्हा मुख्य मार्गावर आणली जातील.

प्रवाशांनी या बदलाची नोंद घेऊन आपल्या प्रवासाचे योग्य नियोजन करावे, असे आवाहन रस्ते विकास महामंडळाने केले आहे. प्रवासादरम्यान कोणतीही अडचण किंवा आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास वाहनचालकांनी नियंत्रण कक्षाच्या ९८२२४९८२२४ किंवा महामार्ग पोलीस विभागाच्या ९८३३४९८३३४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे सूचित करण्यात आले आहे. दरम्यान, पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाने विविध गुन्ह्यांमध्ये जप्त केलेल्या वाहनांच्या लिलावाची घोषणा केली आहे. हा जाहीर लिलाव २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता पार पडणार आहे. यामध्ये एकूण २ ट्रक कंटेनर, २० चारचाकी वाहने आणि २५ दुचाकी वाहनांचा समावेश आहे. या लिलावाबाबत अधिक तपशील हवा असल्यास इच्छुकांनी तळेगाव दाभाडे येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक उत्तम आव्हाड यांच्याशी संपर्क साधावा, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील आडोशी बोगद्याची दुरुस्ती रखडली

पुणे: पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील साडेसहा हजार कोटी रुपये खर्चाचा मिसिंग लिंक प्रकल्प वाहतुकीसाठी खुला करण्याची जय्यत तयारी करणाऱ्या 'महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा'ने (एमएसआरडीसी) याच रस्त्यावरील आडोशी बोगद्याच्या दुरुस्तीचा प्रश्न मात्र तितकासा गांभीर्याने घेतलेला दिसत नाही. या बोगद्याचे खडकाळ छत कोसळून महिना लोटला असला तरी त्याची दुरुस्ती अद्याप सुरूच झालेली नाही.

पवई येथील आयआयटीतील तज्ज्ञांकडून त्याच्या दुरुस्ती व मजबुतीकरणाबाबतचे मार्गदर्शन मिळाल्यानंतरच हे काम हाती घेण्यात येणार असल्याचे 'एमएसआरडीसी'चे कार्यकारी अधिकारी राकेश सोनवणे यांनी सांगितले. 'आयआयटी'तील तज्ज्ञांनी सुमारे तीन आठवड्यांपूर्वी बोगद्याचे सर्वेक्षण करून आपली निरीक्षणे नोंदविली आहेत. त्याआधारेच ते आपला अहवाल देणार आहेत, असेही ते म्हणाले.सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी खोदण्यात आलेल्या २६३ मीटर लांबीच्या या बोगद्याच्या मजबुतीकरणासाठी जिओटेक्निकल तज्ज्ञांच्या सल्ल्याने शॉर्टक्रीट,



बोल्टिंग आणि स्ट्रक्चरल काँक्रीट लायनिंगचा वापर केला होता. तथापि, तरीही गेल्या १८ मार्च रोजी बोगद्यातील छताचा सुमारे २० ते २५ फूट लांब आणि सुमारे दहा ते बारा फूट रुंदीचा खडकाळ भाग खाली कोसळला. या घटनेमुळे दोन-तीन वाहनांचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली.

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर बोरघाटात आडोशीप्रमाणेच भातन, मडाप, खंडाळा आणि कामशेत येथील दोन बोगद्यांसह सहा बोगदे आहेत. आडोशी बोगद्यातील या दुर्घटनेमुळे इतर बोगद्यांच्या सुरक्षेचा मुद्दाही ऐरणीवर आला आहे.सह्याद्री पर्वतरांगेतील या डोंगराची भौगोलिक रचना डेक्कन ट्रॅप या ज्वालामुखीय खडकावर आधारित आहे. त्यामुळे येथील भूस्तर लेयर-केकसारखा आहे. भूगर्भातील हालचालींमुळे यातील स्तर एकमेकांपासून अलग होतात व निसटतात, असे तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे या बोगद्याची दुरुस्ती व मजबुतीकरण कसे करणार याबाबत जाणकारांमध्ये उत्सुकता आहे. तूर्तास दुर्घटनास्थळावरील मुंबई मार्गिका बॅरीकेडिंग करून वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आली आहे. दुरुस्तीनंतरच ती खुली करण्यात येईल.

# व्हॉट्सप लिंक, बनावट ईमेल व 'डिजिटल अरेस्ट'च्या आमिषाने पुण्यात ४८ लाखांची सायबर फसवणूक

पुणे । प्रतिनिधी

सायबर चोरट्यांकडून नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्याचे सत्र सुरूच असून, व्हॉट्सपवर लिंक पाठवून, बँक खाते हॅक करून आणि भीती दाखवून सुमारे ४८ लाख रुपये उकळल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. याप्रकरणी वानवडी, विश्रामबाग आणि काळेपडळ पोलिस ठाण्यात तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वानवडी येथील एका ज्येष्ठ नागरिकाची (वय ७२, रा. सोपानबाग) २५ लाख ४२ हजार रुपयांची फसवणूक झाली आहे. आरोपीने एका कंपनीचा बनावट ईमेल आयडी तयार करून ज्येष्ठ व्यक्तीच्या कंपनीला इ-मेल पाठवला. बँकेचे तपशील बदलल्याचे सांगून चोरट्याने रक्कम स्वतःच्या खात्यात जमा केली. याप्रकरणी वानवडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

काळेपडळ येथे (वय ६४, रा. साई कॉलनी, काळेपडळ) यांना सायबर



चोरट्यांनी 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवून १८ लाख रुपयांचा गंडा घातला. आठ ते १५ एप्रिल दरम्यान त्यांना व्हिडिओ कॉल करून, 'तुमचे आधारकार्ड वापरून दहशतवाद्याने बँक खाते उघडले आहे. या खात्यातून ७० कोटींचा गैरव्यवहार केला आहे,' अशी बतावणी केली. बनावट अटक वॉरंट पाठवून त्यांच्याकडून १८ लाख रुपये उकळले.

तसेच, काळेपडळ परिसरातीलच एका तरुणाच्या (वय ३५, रा. ग्रीन सिटी सोसायटी) व्हॉट्सपवर एक लिंक आली. त्यावर क्लिक केल्यावर सायबर चोरट्याने त्यांचा मोबाईल हॅक केला. तरुणाच्या क्रेडिट कार्डवरून तीन लाख ५१ हजार रुपये परस्पर दुसऱ्या खात्यात जमा केले. याव्यतिरिक्त, विश्रामबाग परिसरातील एका महिलेचा (वय ५१, रा. सरिता अपार्टमेंट, शनिवारवाड्याजवळ) कपडे विक्रीचा व्यवसाय आहे. चोरट्याने महिलेच्या बँक खात्यातून त्यांच्या नकळत एक लाख ३० हजार रुपये दुसऱ्या खात्यात जमा केले. याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.